## मुद्दा क्र दहा. संचालनालया मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना.

**नवीन महाविदयालयांना परवानगी देणे**

**१. योजनेचे नाव :**

नवीन महाविदयालयांना परवानगी देणे.

**२. योजनेचे उदिदष्टे व स्वरुप:**

महाराष्ट्र विदयापीठ कायदा १९९४ कलम ८२ (१ ते ५) अन्वये विदयापीठ आपल्या क्षेत्रात उच्च शिक्षणाच्या उपलब्ध सुविधा लक्षात घेऊन उच्च शिक्षणाची गरज आणि अविकसित भागाच्या गरजा लक्षात घेऊन नवीन महाविदयालयासाठी बृहत आराखडा ॲकेडेमिक कौन्सिल मार्फत तयार करते व व्यवस्थापन समितीच्या शिफारशीने विदयापीठ त्यास मान्यता देते. दर ५ वर्षानी हा आराखडा सुधारित करण्यात येतो.

**३. योजना लाभार्थी :**

उच्च शिक्षणाचा लाभ घेणारे विदयार्थी

**४. योजना मंजूरीसाठी करावयाचा अर्ज:**

जी संस्था नवीन महाविदयालय सुरु करु इच्छिते त्या संस्थेने नवीन महाविदयालयाच्या परवानगीचा अर्ज संबंधित विदयापीठाच्या कुलसचिवांकडे विहित नमुन्यात, विहित शुल्कासह ज्या वर्षी महाविदयालय सुरु करावयाचे त्याच्या पूर्वीच्या वर्षीच्या ऑक्टोबर महिन्याच्या अखेरपर्यंत करावा लागतो विद्यापीठाकडून शिफारस झालेले अर्ज संबंधित विद्यापीठाकडून शासन निर्णय क्र.एनजीसी २०११/(१९३/१०)/मशि-४, दि.३० ऑक्टोबर, २०१० व व शासन निर्णय क्र.एनजीसी २०११/(२४०/११)/मशि-४, दि.२५ ऑक्टोबर, २०११ अन्वये शासनाच्या उच्च शिक्षण विभागाकडे सादर केले जातात.

५. **अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार** :

विदयापीठाच्या अभिप्रायानुसार राज्य शासन यथोचित संस्थांना नवीन महाविदयालय सुरु करण्यास परवानगी देते.

**अशासकीय विनाअनुदानित महाविदयालयांना अनुदान मंजुरीबाबत.**

**१. योजनेचे नाव:**

अशासकीय विनाअनुदानित महाविदयालयांना अनुदान मंजूर करणे.

**२. योजनेचे उदिदष्ट व स्वरुप:**

सुरुवातीस नवीन महाविदयालयांना विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात येते. पहिली तीन वर्षे अशा महाविदयालयांना कोणतेही अनुदान दिले जात नाही. विनाअनुदानीत महाविदयालयांना तीन वर्षे पूर्ण केल्यानंतर चौथ्या वर्षापासून खालीलप्रमाणे विहित अटी पूर्ण केल्यानंतर टप्याटप्याने अनुदान मंजूर करण्यात येते.

**अ)** ४ थ्या वर्षी मान्य वेतन खर्चाच्या २५./.

**ब)** ५ व्या वर्षी मान्य वेतन खर्चाच्या ५०./.

**क)** ६ व्या वर्षी मान्य वेतन खर्चाच्या ७५./.
**ड)** ७ व्या वर्षी व तदनंतर १००./.

मुलींची महाविदयालये व आदिवासी उपयोजना विभागातील महाविदयालये विहित निकष पूर्ण करीत असल्यास ४ थ्या वर्षी १०० टक्के अनुदानावर आणली जातात. नवीन महाविदयालयांना अनुदान मंजूर करताना विद्याशाखानिहाय पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाची विदयार्थीसंख्या खालीलप्रमाणे आवश्यक आहे.

| **अ.क्र.** | **विभाग** | **विद्यार्थी संख्या** | |
|---|---|---|---|
| | | **प्रवेशित** | **परिक्षेस बसलेले** |
| १ | शहरी | ६० | ५० |
| २ | आदिवासी | ४० | ३० |
| ३ | ग्रामीण | ५० | ४० |
| ४ | महिला महाविद्यालये | ५० | ४० |

**३. योजना लाभार्थी:**
शैक्षणिक संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.

**४.योजना मंजुरीसाठी करावयाचा अर्ज :**
विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचे मार्फत प्रस्ताव, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांच्याकडे सादर करावा लागतो.

**५. अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार कोणाला आहेत :**
**शिक्षण** संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना याबाबतच्या अटी व नियमांच्या अधिन राहून अनुदान मंजूर करण्याचे अधिकार आहेत.

**नवीन विद्याशाखा, तुकडया, विषय इत्यादींना अनुदान मंजूर करणे.**

**१. योजनेचे नाव :**
नवीन विद्याशाखा, तुकडया, विषय इत्यादींना अनुदान मंजूर करणे.

**२. योजनेचे उद्दिष्ट व स्वरूप :**

शासन आदेश क्रमांक एनजीसी-२०९१ (३५६७)/विशी-२ अ, दिनांक ८ ऑगस्ट, १९९१ च्या महाविद्यालयांना नवीन विद्याशाखा, विषय, तुकडया सुरूवातीस विनाअनुदान तत्वावर मंजूर करण्यात येतात. मान्यता देण्यात आल्यानंतर पहिला ३ वर्षांमध्ये महाविद्यालयांना कोणतेही अनुदान मंजूर करण्यात येत नाही. त्यानंतर खालील सूत्रानुसार अनुदान मंजूर केले जाते.

**अ)** ४ थ्या वर्षी मान्य वेतन खर्चाच्या २५ टक्के
**ब)** ५ व्या वर्षी मान्य खर्चाच्या ५० टक्के
**क)** ६ व्या वर्षी मान्य वेतन खर्चाच्या ७५ टक्के
**ड)** ७ व्या वर्षी व तद्नंतर १०० टक्के

अनुदानित व विनाअनुदानित महिला महाविद्यालये व आदिवासी उपयोजना क्षेत्रातील महाविद्यालयांतील नवीन विद्याशाखा, नवीन विषय, अभ्यासक्रम व जादा तुकडया यांनाही वरील सूत्रानुसार अनुदान मंजूर केले जाते. शासन परिपत्रक क्रमांक एनजीसी/३५९३/५७४३/विशि-२, दिनांक २४ सप्टेंबर, १९९३ अन्वये प्रत्येक विषयात पदवी स्तरावर सुरूवातीस २४ विद्यार्थी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी १६ विद्यार्थी आवश्यक आहेत. ग्रामीण भागासाठी १० विद्यार्थी आवश्यक आहेत. सामान्य स्तरावर शिकविल्या जाणा-या विषयासाठी प्रथम वर्षासाठी संबंधित विषय घेणा-या विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेतली जाते. विशेष स्तरावर (स्पेशल) शिकविल्या जाणा-या विद्यार्थ्यांची पदवी अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षाची संख्या विचारात घेतली जाते.

**३. योजना लाभार्थी :**
शैक्षणिक संस्थेच्या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.

**४. योजना मंजुरीसाठी करावयाचा अर्ज :**
विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडे विहित नमुन्यात प्रस्ताव संबंधित महाविद्यालयाने सादर करावयाचा आहे.

**५. अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार कोणास आहेत :**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य यांना आहेत.

## वसतिगृहे योजना

- **शासकीय आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांची वसतिगृहे:-**

१. योजनेचे नाव-आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांची वसतिगृहे

२. योजनेचे उद्दिष्टे:-आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळावी या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आलेली आहे.

३. योजनेचे स्वरूप:-आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निवासाच्या सोयी,सुविधा उपलब्ध होण्यासाठी शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.ईबीसी-१६७१/५१७९-एस,दि.३.७.१९७३ व शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.ईबीसी-१६७१/५१७९-एस,दि.१५.२.१९७४ व शासन निर्णय क्र.शिक्षण सेवा योजन विभाग एमआयएस

१०८१/८७०/जीईएन-५, दि.२/९/८२ अन्वये राज्यामध्ये ११ शासकीय आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह (ई.बी.सी) सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. ही वसतिगृहे शासनामार्फत चालविली जातात,या वसतिगृहात विद्यार्थ्यांची कमाल प्रवेश क्षमता १०० आहे व त्यामध्ये शासनाने निश्चित केलेल्या आरक्षणानुसार प्रवेश दिला जातो.प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना कोणतेही शुल्क दयावे लागत नाही.प्रवेशित विद्यार्थ्यांची निवासाची व भोजनाची सोय मोफत केली जाते. राज्यात ही वसतिगृहे खालील ठिकाणी सुरू आहेत.

| **अ.क्रं.** | **वसतीगृहाचे नाव** | **प्रवेश क्षमता** |
|---|---|---|
| १ | मातोश्री शासकीय आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, मालेगाव, जि. नाशिक | १०० |
| २ | मातोश्री शासकीय आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, शहादा, जि. नंदुरबार | १०० |
| ३ | मातोश्री शासकीय आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, यवतमाळ | १०० |
| ४ | मातोश्री शासकीय आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, अमरावती. | १०० |
| ५ | मातोश्री शासकीय आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, बुधगाव, जि.सांगली | १०० |
| ६ | मातोश्री शासकीय आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, कोल्हापूर | १०० |
| ७ | मातोश्री शासकीय आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, नांदेड | १०० |
| ८ | मातोश्री शासकीय आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, बीड, | १०० |
| ९ | मातोश्री शासकीय आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, जव्हार, जि.पालघर | १०० |
| १० | मातोश्री शासकीय आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, वरोरा, जि. चंद्रपूर | १०० |
| ११ | मातोश्री शासकीय आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, वर्धा | १०० |
| | **एकूण** | **११००** |

४ .योजना लाभार्थी:- आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विदयार्थी.

५.कार्यवाही:- वार्षिक परिक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी वसतिगृह प्रमुखांकडे अर्ज करावयाचे असतात.प्रवेश निश्चित करण्यासाठी गठीत केलेल्या निवड समितीद्वारे प्रवेश दिले जातात.

- **मुंबई येथील शासकीय वसतिगृहे:-**

१.योजनेचे नाव-मुंबई येथील शासकीय वसतिगृहे

२.योजनेचे उदिदष्टे:-मुंबई बाहेरील व विशेषत: ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मुंबई येथील शासकीय महाविदयालयात शिक्षण घेण्याकरिता वसतिगृहाची सोय उपलब्ध करून देणे.

३.योजनेचे स्वरूप:- महाराष्ट्र शासनाने मुंबई बाहेरून व विशेषत: ग्रामीण भागातून महाविदयालयीन शिक्षण घेण्यासाठी मुंबईत येणा-या विद्यार्थ्यांची मुंबईत निवासाची सोय होणे कठीण असते आणि म्हणून या विदयार्थ्यांच्या निवासाच्या सोयीसाठी शासनाने मुंबई येथील शासकीय महाविदयालये आणि शासकीय संस्था येथील विद्यार्थ्यांसाठी मुंबईमध्ये ३ शासकीय वसतिगृहांची सोय केलेली आहे.सदरच्या ३ वसतिगृहांपैकी ०२ वसतिगृहे मुलींसाठी व १ वसतिगृहे मुलींसाठी आहेत. शासन निर्णय दि.२३.५.२०१६ मधील नियमानुसार वरील वसतिगृहात प्रवेश व सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

| अ.क्र. | वसतिगृहाचे नाव | लाभार्थी | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १ | सावित्रीबाई फुले महिला छात्रालय,चर्नीरोड,मुंबई | महिलांसाठी | ४५० |
| २ | शासनाचे तेलंग स्मारक मुलींचे वसतिगृह,सी रोड चर्चगेट,मुंबई | महिलांसाठी | २५० |
| ३ | शासकीय मुलांचे वसतिगृह,सी रोड,चर्चगेट मुंबई | मुलांसाठी | ३६० |

४.योजनेचे लाभार्थी-मुंबई बाहेरील विशेषत: ग्रामीण भागातील विद्यार्थी/विद्यार्थीनी

**◆शासकीय महाविदयालये/संस्था/अध्यापक महाविदयालये संलग्नित वसतिगृहे:-**

१.योजनेचे नाव-शासकीय महाविदयालये/संस्था/अध्यापक महाविदयालये संलग्नित वसतिगृहे

२.योजनेचे उदिदष्टे:-राज्यातील प्रत्येक जिल्हयातील विद्यार्थ्यांना शासकीय महाविदयालयात शिक्षण घेण्याकरिता वसतिगृहाची सोय उपलब्ध करून देणे.

३.योजनेचे स्वरूप:- सदर वसतिगृहे ही शासनाची असून या वसतिगृहांमध्ये शासन निर्णयाप्रमाणे प्रवेश व सोयी सुविधा दिल्या जातात. राज्यात एकूण शासकीय अध्यापक महाविदयालये-१२,शासकीय संस्था-७ व शासकीय कला,वाणिज्य विज्ञान,विधी महाविदयालये-८ आहेत.त्यापैकी खालील ठिकाणी मुले व मुलींसाठी वसतिगृहे आहेत.

**१. मुलांचे वसतिगृहे:-**

| **अ.क्र.** | **वसतिगृहाचे नाव** | **प्रवेश क्षमता** |
|---|---|---|
| १ | शासकीय अध्यापक महाविदयालय, छत्रपती संभाजीनगर | ६० |
| २ | शासकीय ज्ञान विज्ञान महाविदयालय,छत्रपती संभाजीनगर | १०५ |
| ३ | शासकीय विज्ञान संस्था छत्रपती संभाजीनगर | ६० |
| ४ | शासकीय विज्ञान संस्था,नागपूर | १०० |
| ५ | वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था,नागपूर | १०० |
| ६ | शासकीय अध्यापक महाविदयालय रत्नागिरी जुने मुलांचे वसतिगृह | ४० |
| | शासकीय अध्यापक महाविदयालय रत्नागिरी नवीन मुलांचे वसतिगृह | ५० |
| ७ | शासकीय अध्यापक महाविदयालय,पनवेल | २५ |

| | | |
|---|---|---|
| ८ | शासकीय अध्यापक महाविदयालय,अकोला | ४२ |
| ९ | शासकीय अध्यापक महाविदयालय,यवतमाळ | ८० |
| १० | शासकीय अध्यापक महाविदयालय,बुलढाणा | ३० |
| ११ | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था,पुर्व मुलांचे वसतिगृह,अमरावती | १०० |
| १२ | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था,पश्चिम मुलांचे वसतिगृह,अमरावती. | १०० |
| १३ | राजाराम महाविदयालय,कोल्हापूर | ८४ |
| १४ | श्रीम.म.ता.शासकीय अध्यापक महाविदयालय,कोल्हापूर | १०० |
| १५ | शासकीय अध्यापक महाविदयालय,अंबाजोगाई,जि.बीड | २० |
| १६ | इस्माईल युसूफ मुलांचे वसतीगृह, जोगश्वरी, मुंबई | १४० |
| | **एकूण** | **१२३६** |

**२.मुलींचे वसतिगृहे:-**

| **अ.क्र.** | **वसतिगृहाचे नाव** | **प्रवेश क्षमता** |
|---|---|---|
| १ | शासकीय अध्यापक महाविदयालय, छत्रपती संभाजीनगर | १८ |
| २ | शासकीय ज्ञान विज्ञान महाविदयालय,छत्रपती संभाजीनगर | ६० |
| ३ | शासकीय विज्ञान संस्था छत्रपती संभाजीनगर | ६० |
| ४ | शासकीय विज्ञान संस्था,नागपूर | १५० |
| ५ | वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था,नागपूर | १०० |
| ६ | शासकीय अध्यापक महाविदयालय,नवीन मुलींचे रत्नागिरी | ५० |
| ७ | शासकीय अध्यापक महाविदयालय,पनवेल | १५ |
| ८ | शासकीय अध्यापक महाविदयालय,अकोला | ४२ |
| ९ | शासकीय अध्यापक महाविदयालय,यवतमाळ | ८० |
| १० | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था,नवीन मुलींचे वसतिगृह,अमरावती | १०० |
| ११ | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था,जुने मुलींचे वसतिगृह,अमरावती | ६० |
| १२ | राजाराम महाविदयालय,कोल्हापूर | ४५ |
| १३ | शासकीय अध्यापक महाविदयालय भंडारा | ५० |
| | **एकूण** | **८३०** |

◆**विभागीय सहसंचालक यांच्या मुख्यालयी मुलींची नवीन वसतिगृहे सुरु करण्याची योजना**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक वसति-२०१०/प्र.क्र.२२८/१०मशि-२ दिनांक २० एप्रिल २०१३ अन्वये राज्यामध्ये मुलींचा उच्च शिक्षणात सहभाग वाढविणे, मुलींची आश्वासित व सुरक्षित निवासाची सोय उच्च शिक्षणाच्या चांगल्या संस्था जेथे स्थित आहेत तेथे व्हावी म्हणून राज्यात ९ ठिकाणी १७७० प्रवेश क्षमतेची नविन वसतिगृहे बांधण्यास व सध्या कार्यरत असलेल्या ५ वसतिगृहांमध्ये ४३० प्रवेश क्षमता आहे. त्यामध्ये ४८० वाढीव प्रवेश क्षमतेसह विस्तार करण्यास याद्वारे शासनाने मान्यता दिली आहे. सदर वसतिगृहांची सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

| अक | वसतिगृहाचे ठिकाण | प्रवेश क्षमता | अंदाजे खर्च (रूपये कोटी) | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|
| १. | मुंबई ( ईस्माईल युसूफ महाविद्यालय मुंबई ) | ३२० | १३.५० | वसतिगृहाचे बांधकाम सुरू झालेले नाही.मुलींच्या वसतिगृहाचा प्रस्ताव मंत्रालयातील अल्पसंख्यांक विभाग दिल्ली येथे जनविकास कार्यक्रम निधी उपलब्धतेसाठी पाठविण्यात आलेला आहे.अदयाप निधी प्राप्त झालेला नाही. |
| २. | पूणे ( डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठ) | ५०० | १८.०० | विभागीय सहंसचालक, उच्च शिक्षण पुणे यांच्या स्तरावर जागा मिळवून घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. |
| ३. | औरंगाबाद (अध्यापक महाविद्यालय ) | २०० | ५.८२ (ज्ञान विज्ञान महाविद्यालयातील वसतिगृहाच्या विस्तारीकरणाच्या खर्चासह) | विभागीय सहसंचालक, कार्यालय औरंगाबाद यांच्या स्तरावरुन वसतीगृहासाठी जागा मिळण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. |
| ४. | जळगांव (शासकिय तंत्राकितन ) | १०० | ३.५० | वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण झालेले नाही. शासकीय तंत्र निकेतन, जळगाव यांचेकडे मुलींच्या वसतिगृहासाठी जागा देण्याचे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | नांदेड (नांदेड विद्यापीठ परिसर) | १०० | ३.०० | सदयस्थितीत वसतिगृह इमारतीचे बांधकाम सुरू आहे. |
| ६. | सोलापूर (महिला औद्योगिक प्रशिक्षण संस्था परिसर) | १०० | ४.०० | मा.जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडे जागा उपलब्ध करुन देण्याबाबत वारंवार पाठपुरावा सहसंचालक सोलापूर यांचेमार्फत सुरु आहे. मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांनी त्यांचे पत्र क्र.२०१३ महसुल शाखा /कार्या-३/नभु-१/प्र.क्र.६३/आरआर-८०/ दिनांक. १३.०१.२०१४ अन्वये मा.आयुक्त, पुणे विभाग, पुणे रेल्वे लाईन वार्ड सिटी सर्व्हे न.८३८८/४ अ (आयटिआयच्या शेजारी ) येथे जागा देण्याबाबत शिफारस केली आहे.मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी त्यांच्या दिनांक १३.०३.२०१४ नुसार अपर मुख्य सचिव, महसुल व वन विभाग (ज-५) मंत्रालय, मुंबई यांना प्रस्ताव सादर केलेला आहे.मुलींच्या वसतिगृहासाठी आज अखेर जागा उपलब्ध न झ ाल्याने वसतिगृह बांधकामाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही होवू शकलेली नाही.जागा उपलब्ध होताच पुढील कार्यवाही करणेत येणार आहे. |
| ७. | पनवेल (अध्यापक महाविद्यालय परिसर) | ३०० | ७.५० | प्रशासकीय मान्यतेस्तव शासनास प्रस्ताव सादर केलेला आहे. |
| ८. | गडचिरोली (शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय ) | ५० | २.२१ | वसतिगृह डिसेंबर २०१९ मध्ये महाविदयालयास हस्तांतरित करण्यात आले आहे. सदयस्थितीत लेखाशिर्ष निर्मिती,निधी उपलब्धता व मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने वसतिगृह अदयापही सुरू झालेले नाही. |
| ९. | जालना ऐवजी (अंबड) | १०० | ३.०० | वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण झालेले असून सध्या फर्निचर काम बाकी आहे.त्यानंतर कार्यान्वित होईल. |

◆**स्व.यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी महोत्सव योजनेअंतर्गत मुलींचे वसतिगृह योजना**

सामान्य प्रशासन विभाग शासन निणर्य क्र वसती-२०१३/ प्र.क्र २९/१३/मशि-२ दि.१५.०३.२०१३ अन्वये स्व.यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी महोत्सव योजनेअंतर्गत जिल्हाधिकारी छत्रपतीसंभाजीनगर,नाशिक,नागपूर,आणि कराड,जि.सातारा येथे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील मुलींसाठी २०० प्रवेश क्षमतेचे प्रत्येकी १ वसतिगृह (प्रत्येक वसतिगृह बांधकामासाठी रू.५.०० कोटी व फर्निशिंगसाठी रू.१.०० कोटी) बांधण्यासाठी एकूण रू.२३,५१,७५,९९१/- इतकी तरतूद खर्च करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे. सदर वसतिगृहांची सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | वसतिगृहाचा प्रकार | एकूण वसतिगृह संख्या | वसतिगृहाचे नाव/ठिकाण | सदयस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | स्व.यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी मुलींचे वसतिगृह | ३ | सातारा (कराड) | सदर वसतिगृह बांधकाम व फर्निशिंगचे काम पुर्ण झालेले आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाने काम पूर्ण करून दि.२५.७.२०१९ रोजी इमारत शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था, कराड यांच्याकडे हस्तांतरित केली आहे.मुलींना वसतिगृहामध्ये प्रवेश दिलेला आहे. |
| | | | नाशिक | वसतिगृहाचे बांधकाम दि.३०.६.२०१५ रोजी पूर्ण् झालेले आहे.वसतिगृह बांधकामासाठी एकूण रू.४८८.६६ लक्ष इतका खर्च झालेला आहे. सोबत उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले आहे.उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय दि.१८.१०.२०२२ अन्वये सदर वसतिगृह सारथी व महाज्योती या महामंडळामार्फत सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. वसतिगृह सारथी व महाज्योती संस्थांना हस्तांतरित करणेत आले असून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. |
| | | | नागपूर | वसतीगृहाच्या इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले आहे.जिल्हाधिकारी, कार्यालयाचे आदेश क्र.१७२/२०१८/१०.५.२०१८ नुसार आय.आय.एम.नागपूर यांना पहिला मजला २० खोली आणि दुस-या मजल्याचे १६ खोली विदयार्थ्यांकरिता देण्यात आले होते. सदर भारतीय प्रबंध संस्थान,नागपूर यांचे पत्र IIMN/CAO/२०२२-२३/२३ दि.६.१०.२०२२ नुसार सदर खोल्या रिकाम्या करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे सदर स्व.यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी महोत्सव अंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | घटकातील २०० मुलींचे वसतिगृह योजनेअंतर्गत वसतिगृहाचा ताबा सुव्यवस्थेतील सहसंचालक कार्यालयाकडे हस्तांतरित करण्याची कार्यवाहीबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग,नागपूर यांना दि.१५.१२.२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.परंतु अदयापपर्यंत ताबा देण्याची कार्यवाही झालेली नाही. |
| | छत्रपतीसंभाजीनगर | | | सदर वसतिगृह इमारतीचे बांधकाम विदुयतीकरण व अंतर्गत फर्निचरसह पूर्ण झालेले आहे. व सदरील वसतिगृह मा.संचालक,विदयार्थी कल्याण विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना हस्तांतरित करण्यात आलेले आहे. |

## ◆स्व. वसंतराव नाईक जन्म शताब्दी वर्ष जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने राबवायच्या योजना.

सामान्य प्रशासन शासन निर्णय, शताब्दी -२०१३/प्र.क्र.३१८/२९-अ/दिनांक.२५ नोव्हेंबर, २०१३ माजी मुख्यमंत्री स्व. वसतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्ष योजनेंतर्गत वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर या महाविद्यालयाच्या आवारामध्ये २०० प्रवेशक्षमतेसह मुलींचे नवीन वसतीगृह बांधण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर कांमाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र** | **जिल्हा** | **स्व वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्ष योजनेंतर्गत हाती घेण्यात आलेल्या कांमाचा आढावा** | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **कामांचा तपशिल** | **मंजुर निधी** | **ठिकाण** | **सद्यस्थिती** |
| १ | नागपूर | वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर येथे मुलींचे नवीन वसतिगृह बांधणे बाबत. | रु.२.०० कोटी | नागपूर | या वसतीगृहाचे बांधकाम सुरु आहे. |
| २ | नागपूर | वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था नागपूर येथील मुलांच्या व मुलींच्या जुन्या वसतिगृहाच्या नुतणीकरण व सौदर्यीकरण करणे. | रु.७.९० कोटी | नागपूर | सदरचे काम पुर्ण झालेले आहे. |

## ◆अखिल भारतीय नागरी सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र (प्रि.आय.ए.एस.ट्रेनिंग सेंटर)

१. योजनेचे नाव:- भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र

२. योजनेची उद्दिष्टये:-अखिल भारतीय प्रशासकीय सेवामध्ये महाराष्ट्रातील विदयार्थ्यांचे प्रमाण वाढविण्याकरिता केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या नागरी सेवापूर्व परीक्षा,मुख्य परीक्षा व मुलाखतीसाठी महाराष्ट्रातील होतकरू विद्यार्थ्यांना प्रोत्साहन व प्रशिक्षण मिळावे यासाठी महाराष्टात प्रथमत:१९७६ मध्ये मुंबई येथे राज्य व्यवसाय शिक्षण संस्था स्थापन करण्यात आलेली आहे.त्याच धर्तीवर शासन निर्णय आय.ए.एस.१०८४/२८६०७/(६१/८४) विशि-१,दि.३०.९.१९८५ नुसार नागपूर,छत्रपती संभाजीनगर व कोल्हापूर तसेच शासन निर्णय क्र.आय.ए.एस-२००९/प्र.क्र.३५/०९/मशि-२ दि.१७.६.२०१३ अन्वये नाशिक व अमरावती येथे भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात आलेली आहेत.

३. योजनेचे स्वरूप:-महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत सदरील केंद्रांचे कामकाज चालते.राज्यभरामध्ये राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था,मुंबई व भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रे नाशिक,कोल्हापूर,छत्रपती संभाजीनगर,अमरावती व नागपूर अशी एकूण सहा प्रशिक्षण केंद्रे कार्यरत आहेत.सदर केंद्रांची प्रवेश क्षमता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रशिक्षण केंद्राचे नाव | केंद्रातील मुळ प्रवेश क्षमता | बार्टी अनुदानित | अल्पसंख्यांक अनुदानित | एकूण प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|---|---|
| १ | राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था,मुंबई | १०० | १० | १० | १२० |
| २ | भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र,नागपूर | १०० | १० | १० | १२० |
| ३ | भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र,छत्रपती संभाजीनगर | ६० | १० | १० | ८० |
| ४ | भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र,कोल्हापूर | ६० | १० | १० | ८० |
| ५ | भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र,नाशिक | ६० | १० | ० | ७० |
| ६ | भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र,अमरावती | ६० | १० | ० | ७० |

४.योजना लाभार्थी:- वर नमुद केल्यानुसार प्रत्येक केंद्रात १०० किंवा ६० पदवीधर विदयार्थी,बार्टी कोटयातून १० व अल्पसंख्यांक कोटयातून १०

**५**.कार्यवाही:- शासन निर्णय क्रमांक प्रीआय/५४१९/प्र.क्र.२४०/मशि-२ दि.१.११.२०२२ अन्वये राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था,मुंबई व सर्व भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रे,नागपूर,कोल्हापूर,छत्रपती संभाजीनगर,नाशिक व अमरावती तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागांतर्गत यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) संचलित डॉ.आंबेडकर स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र,पुणे,डॉ.बाबासाहेब आंबेडकर

संशोधन आणि प्रशिक्षण संस्था,(बार्टी) पुणे,पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित सावित्रीबाई फुले अकॅडमी,पुणे,अंबरनाथ नगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र अंबरनाथ,ठाणे महानगरपालिका संचलित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय संस्था,ठाणे ई.केंद्रांची एकत्रित सामाईक प्रवेश परिक्षा घेण्यात येते.परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विदयार्थ्यांमधून गुणवत्तेच्या व शासनाने विहित केलेल्या आरक्षणाच्या आधारे विदयार्थ्यांनी दिलेल्या विकल्पानुसार सबंधित केंद्रामध्ये पूर्व परीक्षेच्या प्रशिक्षणाकरिता प्रवेश देण्यात येतो.प्रशिक्षण कालावधीचे सत्र साधारणत: माहे डिसेंबर/जानेवारी ते मे असे असते.केंद्रीय लोकसेवा आयोगाची पूर्व परिक्षा उत्तीर्ण होणा-या विदयार्थ्यांना मुख्य परीक्षेच्या प्रशिक्षणासाठी प्रवेश दिला जातो.मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विदयार्थ्यांना मुलाखतीसाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाते.

## ◆प्रियदर्शिनी मुलींची वसतिगृहे:-

१.योजनेचे नाव:-प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह योजना

२.योजनेचे उदिदष्टे:-मुलींच्या उच्च शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी मुलींची वसतिगृहे सुरू करणे.

३.योजनेचे स्वरूप:- भारताच्या माजी पंतप्रधन स्व.इंदिरा गांधी यांच्या स्मरणार्थ इ.स.२००० सालापर्यंत राज्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी ५० ते १०० मुलींची सोय असलेली प्रियदर्शिनी वसतिगृहे सुरू करण्याचा धारेणात्मक निर्णय शासनाने घेतलेला आहे.त्यानुसार उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्रमांक. टीडब्ल्यु/१०९०/१५६१३३/(४१) विशि-५ दि.१८.९.१९९० व शासन निर्णय क्र.टीडब्ल्युएच-१०९४/मशि-४ दि.३१.७.१९९५ मधील तरतुदीनुसार राज्यातील २१ स्वयंसेवी संस्थांना प्रियदर्शिनी वसतिगृहे सुरू करण्यास मान्यता दिलेली आहे.

सदरची वसतिगृहे ही सेवाभावी संस्थांना चालविण्यासाठी दिली जातात.उच्च माध्यमिक ते पदवी स्तरावरील व तंत्रशिक्षणामधील अभ्यासक्रम शिकणा-या विद्यार्थीनींना वसतिगृहात प्रवेश दिला जातो.प्रत्येक वसतिगृहात जास्तीत जास्त ५० विद्यार्थीनींना प्रवेश दिला जातो.विद्यार्थीनीस वसतिगृहात निवासाकरिता कोणतेही शुल्क आकारले जात नाही.शासन निर्णय,उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक वसति-२०१०/प्र.क्र.३०५/१०/मशि-२ दि.५.७.२०१३ अन्वये वसतिगृहात राहणा-या विद्यार्थीनींना शासनाकडून देण्यात येणा-या परिरक्षण (परिपोषण) दरमहा भत्यात व अधिक्षिकेच्या मानधनात वाढ करण्यात आलेली आहे.प्रत्येक विद्यार्थीनींना दरमहा रूपये ९०० (शैक्षणिक वर्षातील १० महिन्यांकरिता) व वसतिगृह अधिक्षिकेस रूपये ४५०० इतके मानधन देण्यात येते.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त राज्यात विविध २१ ठिकाणी प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह सुरू करण्यात आलेले आहेत.त्यापैकी १५ सुरू आहेत.राज्यात ही वसतिगृहे खालील ठिकाणी सुरू आहेत.

| अ.क्र | वसतीगृहाचे नाव | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १ | प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह, शिरपुर, ता. शिरपुर, जि.धुळे. | ५० |
| २ | प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. | ५० |

| | | |
|---|---|---|
| **३** | प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह, उस्मानाबाद, ता. जि.उस्मानाबाद. | **५०** |
| **४** | प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह, आष्टी, ता.आष्टी, जि.बीड. | **५०** |
| **५** | प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह, कन्नड, ता.कन्नड, जि.औरंगाबाद. | **५०** |
| **६** | प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह, भोकरदन, ता.भोकरदन, जि.जालना. | **५०** |
| **७** | प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह, वेंगुर्ला, ता.वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग. | **५०** |
| **८** | प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह, नांदेड, ता.जि.नांदेड | **५०** |
| **९** | प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह, किनवट, ता.किनवट, जि.नांदेड. | **१००** |
| **१०** | प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह, वसंतनगर कोटग्याळ, ता.मुखेड, जि.नांदेड. | **५०** |
| **११** | प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह, चव्हाणवाडी, ता.मुखेड, जि.नांदेड. | **५०** |
| **१२** | प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह, अमहदपुर, ता.अहमदपुर, जि.लातुर. | **५०** |
| **१३** | प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह, पुसद, ता. पुसद, जि.यवतमाळ | **५०** |
| **१४** | प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह, घांटजी, ता.घांटजी, जि.यवतमाळ. | **५०** |
| **१५** | प्रियदर्शिनी मुलींचे वसतीगृह, नेरपरसोपंत, ता.नेरपरसोपंत, जि. यवतमाळ. | **५०** |
| | **एकुण** | **८००** |

**४.योजना लाभार्थी:-** सबंधित तालुक्यातील रहिवासी ५० विद्यार्थीनी

५.योजना मंजुरीसाठी करावयाचा अर्ज:- नवीन वसतिगृह सुरू करण्यासाठी सबंधित सेवाभावी संस्थांनी आवश्यक त्या कागदपत्रासह परिपूर्ण अर्ज प्रत्येक वर्षी विभागीय सहसंचालकांमार्फत शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे १६ या कार्यालयाकडे पाठवावयाचे आहेत.

६.अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार:-सेवाभावी संस्थांना ५० मुलींसाठी वसतिगृह सुरू करण्यासाठी मान्यता देण्याचे अंतिम अधिकार शासनाकडे आहेत.

## अखिल भारतीय नागरी सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र (प्रि.आय.ए.एस.ट्रेनिंग सेंटर)

**१.योजनेचे नाव-**

भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र

**२.योजनेची उद्दिष्टये-**अखिल भारतीय प्रशासकीय सेवामध्ये महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढविण्याकरीता केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा पूर्व परिक्षा, मुख्य परिक्षा व मुलाखतीसाठी महाराष्ट्रातील होतकरु विद्यार्थ्यांना प्रोत्साहन व प्रशिक्षण मिळण्यासाठी सदर केंद्रे सुरु करण्यात आली आहेत.

**३. योजनेचे स्वरुप-** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत सदरील केंद्रांचे कामकाज चालते. राज्यभरामध्ये राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रे नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती व नागपूर अशी एकूण सहा प्रशिक्षण केद्रे कार्यरत आहेत. सदर केद्रांची प्रवेश क्षमता खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | प्रशिक्षण केंद्रांचे नाव | केंद्रातील प्रवेश क्षमता | बार्टी अनुदानीत | अल्पसंख्याक अनुदानीत | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई | १०० | १० | १० | **१२०** |
| २ | भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, नागपूर | १०० | १० | १० | **१२०** |
| ३ | भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, औरंगाबाद | ६० | १० | १० | **८०** |
| ४ | भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर | ६० | १० | १० | **८०** |
| ५ | भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक | ६० | १० | ० | **७०** |
| ६ | भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, अमरावती | ६० | १० | ० | **७०** |

४. **योजना लाभार्थी-** वर नमूद केल्यानुसार प्रत्येक केंद्रात १०० किंवा ६० पदवीधर विद्यार्थी, बार्टी कोटयातून १० व अल्पसंख्यांक कोटयातून १०

**५.कार्यवाही-** शासन निर्णय क्रमांक प्रीआय/५४१९/प्र.क्र.२४०/मशि-२, दि. १.११.२०२२ अन्वये राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व सर्व भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्रे, नागपूर, कोल्हापूर, औरंगाबाद, नाशिक व अमरावती तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागांतर्गत यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) संचलित डॉ आंबेडकर स्पर्धा परिक्षा मागदर्शन केंद्र, पुणे, डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे, पिंपरी चिंचवड महानगर पालिका संचलित सावित्रीबाई फुले अकॅडमी, पुणे, अंबरनाथ नगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र अंबरनाथ, ठाणे महानगर पालिका संचलित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, ठाणे ई. केंद्रांची एकत्रित सामाईक प्रवेश परीक्षा घेण्यात येते. परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यामधुन गुणवत्तेच्या व शासनाने विहित केलेल्या आरक्षणच्या आधारे विद्यार्थ्यांनी दिलेल्या विकल्पानुसार संबंधीत केंद्रामध्ये पूर्व परीक्षेच्या प्रशिक्षणाकरीता प्रवेश देण्यात येतो. प्रशिक्षण कालावधीचे सत्र साधारणत: माहे डिसेंबर/जानेवारी ते मे असे असते. केद्रीय लोकसेवा आयोगाची पूर्व परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेच्याच्या प्रशिक्षणासाठी प्रवेश दिला जातो. मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी अर्थसहाय उपलब्ध करुन दिले जाते.

## शिष्यवृत्ती योजना-

| अ.क्र | विषय | शासन निर्णय क्रमांक व दिनांक | अभिप्राय (असल्यास) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | राज्यशासनाच्या शिष्यवृत्ती योजना | |
| १ | **गुणवान विद्यार्थांना अर्थिक सहाय्य (कनिष्ठ स्तर)** | शासन निर्णय दिनांक १७.५.१९८४,०१.०३.२०११ व ११.०९.२०२३ | **१.योजनेचे नाव** -गुणवान विद्यार्थांना अर्थिक सहाय्य (कनिष्ठ स्तर)<br>**२. योजनेचे स्वरुप** - शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या मुंबई, पुणे, लातूर,औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर, अमरावती, नागपूर, व कोकण या विभागातील परीक्षेत गुणवान विद्यार्थ्यांची प्रतिवर्षी खालीलप्रमाणे निवड करण्यात येते.<br>१. सर्वसाधारण गुणवान यादीमधून पहिले पाच विद्यार्थी (५)<br>२. गुणवात्तेनुसार पहिल्या तीन मुली (३)<br>३.गुणवत्तेनुसार मागासवर्गातील विद्यार्थ्यांमधून पहिले तीन विद्यार्थी (३)<br>प्रत्येक विभागात एकूण ११ याप्रमाणे ९ विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांची एकूण संख्या ९९.<br>**३.योजनेचा उद्देश** - गुणवाण विद्यार्थांना उच्च शिक्षणासाठी प्रात्साहन देणे.<br>**४. योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव** - सर्व प्रवर्गसाठी<br>**५. योजनेच्या प्रमुख अटी:**<br>१. उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत वरचा क्रमांक मिळविणारे गुणवान विद्यार्थी सदर शिष्यवृत्ती साठी पात्र आहेत.<br>२. सदर योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादीच्या अधारे निवड पत्र पाठविण्यात येते शिष्यवृत्तीसाठी अर्ज करतांना सदर पत्राची छायांकित प्रत अपलोड करणे आवश्यक आहे.<br>३. पात्र विद्यार्थांची यादी संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. संबंधित यादीमध्ये नाव असलेले विद्यार्थीच सदर शिष्यवृत्तीसाठी (Fresh) अर्ज करु शकतात.<br>४. सदर यादीतील महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर शिकत असलेले महाराष्ट्रीयन विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करु शकतात.<br>५. शिष्यवृत्ती पुढे चालू राहण्यासाठी विद्यार्थ्याचे वर्तन, प्रगती समाधानकारक असणे आवश्यक आहे.<br>६. या योजनेचा लाभ घेत असतांना विद्यार्थ्याला केंद्र अथवा राज्य शासनाच्या इतर कोणत्याही शिष्यवृत्ती अथवा सवलतीचा लाभ घेता येणार नाही,<br>मात्र मागसवर्गीय विद्यार्थ्यांच्या बाबतीत ही आट लागू नाही, त्यांना केंद्र/ राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती / सवलती नुसार शिक्षण फी किंवा परीक्षा फीची भरपाई होत असेल तर अशी शिक्षण फी किंवा परीक्षा फी मागसवर्गीय विद्यार्थ्यांना देय नाही.<br>तसेच राष्ट्रीय प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ घेता येईल. मात्र राष्ट्रीय प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती नुसार मिळणाऱ्या पुस्तक अनुदानाची रक्कम वजा करून सदर शिष्यवृत्तीसाठी पुस्तक अनुदानाची रक्कम देय आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ७. गुणवान विद्यार्थ्यास एखाद्या वर्षी गुणाची टक्केवारी कमी असल्यास त्याचे त्यावर्षी आर्थिक सहाय्य स्थगीत<br>ठेवण्यात येईल. पुढील वर्षी सदर विद्यार्थ्यास गुणाची अट पूर्ण केल्यास त्याचे आर्थिक सहाय्य सुरु करण्यात येईल.<br>८. मागील वर्षी सदर शिष्यवृत्ती चा लाभ घेतलेले विद्यार्थी शिष्यवृत्ती च्या नुतनीकरणासाठी अर्ज करू शकतात.<br>९. कनिष्ठ महाविद्यालय :- नूतनीकरनासाठी मागील वर्षात विद्यार्थ्यांना किमान ५५ टक्के गुण आवश्यक.<br>१०. वरिष्ठ महाविद्यालय :- नूतनीकरनासाठी मागील वर्षात विद्यार्थ्यांना किमान ६५ टक्के गुण आवश्यक.<br>११. नूतनीकरनासाठी विद्यार्थ्यांनी मागील वर्षाचा Application ID चा उपयोग करावा.<br>**६. आवश्यक कागदपत्रे**<br>१. मागील वर्षाची गुणपत्रिका.<br>२. चालू वर्षाची शुल्क भरल्याची पावती.<br>३. वसतिगृहाचे शुल्क भरल्याची पावती.<br>४. उच्च शिक्षण संचालनालयाकडील (DHE) शिष्यवृत्ती मंजूरीचे पत्र.<br>५. वैद्यकीय खर्चाबाबतची पावती (असल्यास)<br>**७. दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप**<br>सदर शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे ११ प्रकारच्या शुल्काचा लाभ देण्यात येतो.<br>१. प्रवेश शुल्क - १०० टक्के<br>२. सत्र शुल्क - १०० टक्के<br>३. भोजन शुल्क - १५० रु. प्रतिमाह प्रमाणे दहा महिन्याकरिता = १५००/<br>४. वैद्यकिय खर्च - विद्यार्थ्यांचा झालेला खर्च किंवा रु. १२० यापैकी जी रक्कम कमी असेल अशी रक्कम.<br>५. परीक्षा शुल्क - १०० टक्के<br>६. शिक्षण शुल्क - १०० टक्के<br>७. ग्रंथालय शुल्क - १०० टक्के<br>८. पुस्तके व इतर स्टेशनरी साहित्य<br>a) ११वी , १२ वी - ३०० रु<br>b) पदवी / पद्व्युत्तर अभ्यासक्रम (science, veterinary and Agriculture अभ्यासक्रम वगळून) - ५०० रू वार्षिक.<br>c) पदवी / पद्व्युत्तर अभ्यासक्रम (science, veterinary and Agriculture अभ्यासक्रम वगळून) - ७०० रू वार्षिक.<br>d) वैद्यकीय आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रम - १००० रु. वार्षिक<br>e)पदवीका अभ्यासक्रम - ५०० रु. वार्षिक<br>९ वसतीगृह शुल्क - ६०० रू वार्षिक<br>१० प्रयोगशाळा शुल्क - १०० टक्के<br>११ जिमखाना शुल्क - १०० टक्के<br>• शासनमान्य व अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये यामध्ये मान्य दराने अकारल्या जाणाऱ्या फी ची प्रतिपूर्ती. विना अनुदानित पण शासनमान्य अशा अंभियांत्रिकी / वैद्यकीय महाविद्यालयात अथवा तांत्रिक शिक्षण संस्थेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुदानित अभियांत्रिकी / वैद्यकीय तमहाविद्यालये तांत्रिक संस्था यामध्ये आकारल्या जाणाऱ्या फीच्या दराने प्रतिपूर्ती करण्यात येते. |
| २ | **गुणवान विद्यार्थांना** | शासन निर्णय दिनांक | **१.योजनेचे नाव** - गुणवान विद्यार्थांना अर्थिक सहाय्य (वरिष्ठ स्तर)<br>**२. योजनेचे स्वरुप** -शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | **अर्थिक सहाय्य (वरिष्ठ स्तर)** | १७.५.१९८४, ०१.०३.२०११ व ११.०९.२०२३ | मुंबई, पुणे, लातूर, औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर, अमरावती, नागपूर, व कोकण या विभागातील परीक्षेत गुणवान विद्यार्थ्यांची प्रतिवर्षी खालीलप्रमाणे निवड करण्यात येते.<br>१. सर्वसाधारण गुणवान यादीमधून पहिले पाच विद्यार्थी (५)<br>२. गुणवात्तेनुसार पहिल्या दोन मुली (२)<br>३.मागासवर्गातील विद्यार्थ्यांमधून पहिले दोन विद्यार्थी (२)<br>४ विज्ञान विद्याशाखेतील पहिले दोन दोन विद्यार्थी (२)<br>५. कला विद्याशाखेतील दोन विद्यार्थी (२)<br>६. वाणिज्य विद्याशाखेतील दोन विद्यार्थी (२)<br>प्रत्येक विभागात एकूण १५ याप्रमाणे ९ विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांची एकूण संख्या १३५.<br>**३.योजनेचा उद्देश -** गुणवाण विद्यार्थांना उच्च शिक्षणासाठी प्रात्साहन देणे.<br>**४. योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव-** सर्व प्रवर्गासाठी<br>**५. योजनेच्या प्रमुख अटी**<br>१. उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत वरचा क्रमांक मिळविणारे गुणवान विद्यार्थी सदर शिष्यवृत्ती साठी पात्र आहेत.<br>२. सदर योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादीच्या अधारे निवड पत्र पाठविण्यात येते शिष्यवृत्तीसाठी अर्ज करतांना सदर पत्राची छायांकित प्रत अपलोड करणे आवश्यक आहे.<br>३. पात्र विद्यार्थांची यादी संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. संबंधित यादीमध्ये नाव असलेले विद्यार्थीच सदर शिष्यवृत्तीसाठी (Fresh) अर्ज करु शकतात.<br>४. सदर यादीतील महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर शिकत असलेले महाराष्ट्रीयन विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करु शकतात.<br>५. शिष्यवृत्ती पुढे चालू राहण्यासाठी विद्यार्थ्याचे वर्तन, प्रगती समाधानकारक असणे आवश्यक आहे.<br>६. या योजनेचा लाभ घेत असतांना विद्यार्थ्याला केंद्र अथवा राज्य शासनाच्या इतर कोणत्याही शिष्यवृत्ती अथवा सवलतीचा लाभ घेता येणार नाही,<br>मात्र मागसवर्गीय विद्यार्थ्यांच्या बाबतीत ही आट लागू नाही, त्यांना केंद्र/ राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती / सवलती नुसार शिक्षण फी किंवा परीक्षा फी ची भरपाई होत असेल तर अशी शिक्षण फी किंवा परीक्षा फी मागसवर्गीय विद्यार्थ्यांना देय नाही.<br>तसेच राष्ट्रीय प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्याना सदर योजनेचा लाभ घेता येईल.मात्र राष्ट्रीय प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती नुसार मिळणऱ्या पुस्तक अनुदानाची रक्कम वजा करून सदर शिष्यवृत्तीसाठी पुस्तक अनुदानाची रक्कम देय आहे.<br>७. गुणवान विद्यार्थ्यास एखाद्या वर्षी गुणाची टक्केवारी कमी असलेल्या त्याचे त्यावर्षी आर्थिक सहाय्य स्थगीत ठेवण्यात येईल. पुढील वर्षी सदर विद्यार्थ्यास गुणाची अट पूर्ण केल्यास त्याचे आर्थिक सहाय्य सुरु करण्यात येईल.<br>८. मागील वर्षी सदर शिष्यवृत्ती चा लाभ घेतलेले विद्यार्थी शिष्यवृत्ती च्या नुतनीकरणासाठी अर्ज करू शकतात.<br>९. वरिष्ठ महाविद्यालय:- नूतनीकरनासाठी मागील वर्षात विद्यार्थ्याना किमान ६५ टक्के गुण आवश्यक.<br>१०. नूतनीकरनासाठी विद्यार्थ्यानी मागील वर्षाचा Application ID चा उपयोग करावा.<br>**६. आवश्यक कागदपत्रे**<br>१. मागील वर्षाची गुणपत्रिका.<br>२. चालू वर्षाची शुल्क भरल्याची पावती.<br>३. वसतिगृहाचे शुल्क भरल्याची पावती.<br>४. उच्च शिक्षण संचालनालयाकडील (DHE) शिष्यवृत्ती मंजूरीचे पत्र. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ५. वैद्यकीय खर्चाबाबतची पावती (असल्यास)<br>**७. दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप**<br>सदर शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे ११ प्रकारच्या शुल्काचा लाभ देण्यात येतो.<br>१.प्रवेश शुल्क - १०० टक्के<br>२. सत्र शुल्क - १०० टक्के<br>३. भोजन शुल्क - १५० रु. प्रतिमाह प्रमाणे दहा महिन्याकरिता = १५०० रू.<br>४. वैद्यकिय खर्च - विद्यार्थ्याचा झालेला खर्च किंवा रु. १२० यापैकी जी रक्कम कमी असेल अशी रक्कम.<br>५. परीक्षा शुल्क - १०० टक्के<br>६. शिक्षण शुल्क - १०० टक्के<br>७. ग्रंथालय शुल्क - १०० टक्के<br>८. पुस्तके व इतर स्टेशनरी साहित्य<br>a) ११वी , १२ वी - ३०० रु<br>b) पदवी / पद्व्युत्तर अभ्यासक्रम (science, veterinary and Agriculture अभ्यासक्रम वगळून) - ५०० रू वार्षिक.<br>c) पदवी / पद्व्युत्तर अभ्यासक्रम (science, veterinary and Agriculture अभ्यासक्रम वगळून) - ७०० रू वार्षिक.<br>d) वैद्यकीय आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रम - १००० रु. वार्षिक<br>e)पदवीका अभ्यासक्रम - ५०० रु. वार्षिक<br>९. वसतीगृह शुल्क - ६०० रू वार्षिक<br>१०. प्रयोगशाळा शुल्क - १०० टक्के<br>११. जिमखाना शुल्क - १०० टक्के<br>शासनमान्य व अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये यामध्ये मान्य दराने अकारल्या जाणाऱ्या फी ची प्रतिपूर्ती. विना अनुदानित पण शासनमान्य अशा अंभियांत्रिकी / वैद्यकीय महाविद्यालयात अथवा तांत्रिक शिक्षण संस्थेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुदानित अभियांत्रिकी / वैद्यकीय तमहाविद्यालये तांत्रिक संस्था यामध्ये आकारल्या जाणाऱ्या फीच्या दराने प्रतिपूर्ती करण्यात येते. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | **डॉ. पंजाबाराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना** | शासन निर्णय दिनांक ७.१०.२०१७, दिनांक २२.०२.२०१८ दिनांक ११.०७.२०१९ | सदर शिष्यवृत्ती उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय / अशासकीय अनुदानित / अंशत: अनुदानित(टप्पा अनुदान - विना अनुदान ) / कायम विनाअनुदानित महाविद्यालयामध्ये व अकृषी विद्यापीठे व त्या विद्यापीठा अंतर्गत असलेल्या उपकेंद्रामधील (खाजगी अभिमत विद्यावपीठे / स्वयं अर्थसकरय्यीत खाजागी विद्यावपीठे वगळून) व्यावसायीक व बिगर व्यावसायीक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता वसतिगृह निवार्ह भत्ता योजनेचा लाभ देय आहे.<br>सदर योजना बिगर आरक्षित प्रवर्ग तसेच सामातिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहील.<br>**योजनेच्या प्रमुख अटी**<br>१.राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेस पात्र विद्यार्थी सदर योजनेसाठी अर्ज करण्यास पात्र आहेत.<br>२.विद्यार्थ्याने शासकीय / निकशासकीय / खाजगी वसतिगृहामध्ये प्रवेश घेतला असल्यास त्या विद्यार्थ्याने त्याबाबतचा पुरावा अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.<br>३.तसेच खाजगी मालकीच्या घरामध्ये विद्यार्थ्याने स्वत:ची राहण्याची सोय केली असल्यास अशा विद्यार्थ्यास नोंदणीकृत अथवा नोटाराईज भाडे कराराची प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.<br>४.एखाद्या विद्यार्थ्याने सामान्य रहिवासी असलेल्या त्याच्या गावातील / शहरातील संस्थेमध्ये अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतल्यास त्यास निर्वाह भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.<br>५.सदर योजनेचा लाभ हा कुटुंबातील केवळ दोन अपत्यांपर्यत मर्यादित आहे.<br>६.एखाद्या विद्यार्थ्यास अन्य कोणत्याही योजनेखाली निवार्ह भत्ता मिळत असल्यास असा विद्यार्थी या योजनेखाली लाभ मिळण्यास अपात्र आहे.<br>७.विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या कालावधीकरीताच निवार्हभत्ता देण्यात येतो. तथापि एखादा विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास अथवा काही कारणांमुळे त्याला वरच्या वर्गात प्रवेश न मिळाल्यास त्यास त्या वर्षापुरता निवार्ह भत्ता लाभ अनुज्ञेय आहे.<br>८.या योजनेअंतर्गत रुपये १.०० लाखपर्यत उत्पन्न असलेल्या विद्यार्थ्याकरीता निवार्हभत्त्याचा लाभ देण्याकरीता संख्येची कोणतीही मर्यादा असणार नाही. मात्र रुपये १.०० लाख ते रुपये ८.०० लाख उत्पन्न मर्यादा असलेल्या व व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याकरीता प्रत्येक जिल्हयासाठी लाभार्थी विद्यार्थ्याची कमाल संख्या ५०० इतकी निश्चित करण्यात येज आहे. त्यापैकी ३३ टक्के इतक्या जागा विद्यार्थ्याकरीता राखीव ठेवण्यात येतात. तथापि पुरेशा विद्यार्थिनी उपलब्ध न झाल्यास रिक्त राहणाऱ्या जागा त्याच जिल्हयातील विद्यार्थ्याकरीता उपयोगात येतात.<br>९.प्रत्येक जिल्हयातील कोटा हा प्राप्त होणाऱ्या अर्जाच्या संख्येनुसार प्रमाणशीररित्या(Proportionally) निश्चित करण्यात येतो.<br>**आवश्यक कागदपत्रे**<br>**१.**सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>२.पालकांचे अल्पभूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजुर असलेबाबतचे प्रमाणपत्र किंवा शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षाचे संबंधित तहसिलदार अथवा सक्षम अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>३. CAP संबंधित कागदपत्रे.(केवळ विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम)<br>४. गॅप संबंधित दस्तऐवज (गॅप असल्यास)<br>५. दोन मुलांचे कुटुंब घोषणापत्र.<br><br>**शासन निर्णय दि. 05.01.2024 नुसार, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष 2023-24 पासून खालील सुधारीत** |

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td></td>
<td>
दराने निर्वाह भत्ता पात्र विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>भत्ता</th><th>मुंबई शहर,मुंबई उपनगर,नवी मुंबई,ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड,नागपूर या शहरात उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी</th><th>इतर महसुली विभागीय शहरतील व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी.</th><th>इतर जिल्ह्यांच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी</th><th>तालुका ठिकाणी उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी</th></tr>
<tr><td>१</td><td>भोजन भत्ता</td><td>३२,०००/-</td><td>२८,०००/-</td><td>२५,०००/-</td><td>२३,०००/-</td></tr>
<tr><td>२</td><td>निवास भत्ता</td><td>२०,०००/-</td><td>१५,०००/-</td><td>१२,०००/-</td><td>१०,०००/-</td></tr>
<tr><td>३</td><td>निर्वाह भत्ता</td><td>८,०००/-</td><td>८,०००/-</td><td>६,०००/-</td><td>५,०००/-</td></tr>
<tr><td></td><td>एकूण रक्कम</td><td>६०,०००/-</td><td>५१,०००/-</td><td>४३,०००/-</td><td>३८,०००/-</td></tr>
</table>
</td>
</tr>
<tr>
<td>४.</td>
<td>स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य</td>
<td>शासन निर्णय दिनांक २३.११.१९६५, दिनांक १३.०९.२०१९</td>
<td>
सदर योजनेंतर्गत राज्यातील मान्यता प्राप्त अनुदानित शैक्षणिक संस्थेत पदवी व पदव्युत्तर स्तरावर शिक्षण घेण्याऱ्या स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलतीचा लाभ मिळण्यासाठी शासन निर्णय दिनांक २३.११.१९६५, दिनांक १३.०९.२०१९ अन्वये राज्य शासनाची स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्ययांना आर्थिक सहाय्य ही शिष्यवृत्ती सुरू करण्यात आली. हि योजना सर्व प्रवर्गासाठी लागू आहे.<br>
योजनेच प्रमुख अटी-<br>
१. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असण आवश्यक आहे.<br>
२. अर्जदार स्वातंत्र्य सैनिकांचा पाल्य असण आवश्यक आहे. आणि नातवंड (मृत पावलेल्या मुलांची मुले) या योजनेसाठी अर्ज करू शकतात.<br>
३. अर्जदार स्वातंत्र्य सैनिकांचा पाल्य असणे आवश्यक आहे.<br>
४. सदर योजनेचा लाभ राज्यातील शासकीय / अशासकीय अनुदानित महाविद्यालयामधील अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच देय आहे.<br>
५. महाराष्ट्र राज्याच्या बाहेर शिकत आसलेले महाराष्ट्रातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकत नाहीत.<br>
६. या सवलती समाधानकारक प्रगती, चांगली वर्तणूक व नियमित उपस्थिती असल्यास विहित अभ्यासक्रम संपेपर्यंत चालू राहतील.<br>
७. मागील वर्षी सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेले विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणसाठी अर्ज करू शकतात.<br>
आवश्यक कागदपत्रे-
</td>
</tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | | | १. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र<br>२. मागील वर्षाची गुणपत्रीका<br>३. बोनाफाईड सर्टिफिकेट<br>४. स्वातंत्र्य सैनिकाला ज्याठिकाणी कारावासाची शिक्षा झालेली आहे त्या जिल्ह्यातील दंडाधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.<br>**दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप-**<br>१. प्रवेश शुल्क १०० टक्के<br>२.सत्र शुल्क १०० टक्के<br>३.ग्रंथालय शुल्क १०० टक्के<br>४.प्रयोगशाळा शुल्क १०० टक्के<br>५.**शिक्षण शुल्क-**<br>लाभार्थी विद्यार्थ्यांच शिक्षा शुल्काची रक्कम महाविद्यालयांकडून आकारली जात नाही. तसेच संबंधित महाविद्यालयास सदरची रक्कम देण्यात येत नाही.(सदर शिष्यवृत्तीसाठी केवळ शासकीय,अनुदानित महाविद्यालयांतील विद्यार्थीच पात्र आहेत)<br>६.**इतर शिष्यवृत्ती रक्कम-**<br>a)पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम(अभियांत्रिकी अभ्यासक्रम वगळून)-५०रु. वार्षिक<br>b) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम (अभियांत्रिकी अभ्यासक्रम )-६०रु. वाषिक<br>७.**पुस्तके व इतर खर्च-**<br>a) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम(अभियांत्रिकी अभ्यासक्रम वगळून)-२००रु. वार्षिक<br>b) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम(अभियांत्रिकी अभ्यासक्रम)-४००रु. वार्षिक |
| ५ | **माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य** | शासन निर्णय दिनांक १४.०१.१९८५, दिनांक १३.०९.१९९४ | **योजनेचे स्वरुप-** सदर योतनेतंर्गत राज्यातील मान्यता प्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्थेत पदवी व पदव्युत्तर स्तरावर शिक्षण घेणाऱ्या माजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलतीचा लाभ देण्यात येतो. सदर शिष्यवृत्तीसाठी केवळ शासकीय, अनुदानित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यीच पात्र आहेत.<br>**योजनेचा उद्देश-** राज्यातील मान्यता प्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्थेत पदवी व पदव्युत्तर स्तरावर शिक्षण घेणाऱ्या माजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलतीचा लाभ देणे.<br>**योजना ज्या प्रवर्गसाठी लागू आहे त्याचे नाव**-सर्व प्रवर्गसाठी<br>**योजनेचे प्रमुख अटी**<br><br>१. महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र धारण करणाऱ्या किंवा महाराष्ट्रत भरती झालेल्या मेजर, नौदल व वायु दलातील तत्सम दर्जाच्या हुद्यापर्यंत (वा त्यापेक्षा कमी दर्जाच्या हुद्यावरुन) सेवेत निवृत्त झालेल्या माजी सैनिकांच्या मुलांना/मुलींना, पत्नींना/विधवांना या योजनेखाली शैक्षणिक सवलती देय आहेत.<br>२. वार्षिक परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या अथवा वरच्या वर्गात पदोन्नत न झाल्यास सवलती स्थगीत ठेवण्यात येतील. मात्र जर नंतर विद्यार्थी वरच्या वर्गात पदोन्नत झाला की त्यास ही सवलत पुढे चालू ठेवण्यात येईल.<br>३. या सवलतीचा लाभ घेणाऱ्या व्यक्तीस अन्य दुसऱ्या योजनेखाली फी माफी, पुस्तक अनुदान, गणवेश अनुदान इत्यादी सवलतींचा लाभ या सवलती बरोबर घेता येणार नाही. तसेच एकाच वेळी एका विद्यार्थ्याला एका पेक्षा एक जास्त अभ्यासक्रमांना या सवलतीचा लाभ दिला जाणार नाही.<br>४. केवळ शासकीय, अनुदानित महाविद्यालयांधील अभ्यासक्रमास प्रवेश घेणारे विद्यार्थीच अर्ज करण्यास पात्र आहेत.<br>५. महाराष्ट्रा बाहेर शिकत असलेले . महाराष्ट्रातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करु शकत नाहीत.<br>६. या सवलती समाधानकारक प्रगती, चांगली वर्तणूक व नियमित उपस्थिती असल्यास विहित अभ्यासक्रम संपेपर्यत चालू राहतील. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ७. नूतनीकरनासाठी विद्यार्थांनी मागील वर्षीच्या Application ID चा उपयोग करावा.<br>**आवश्यक कागदपत्रे**<br>१. महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र किंवा पालकांचे माजी सैनिकाचे महाराष्ट्रात भरती / सेवानिवृत्त झालेबाबतचे प्रमाणपत्र.<br>२. डी.एस.एस.ए.बोर्ड/सी.एस.एस.ए.बोर्ड यांचे महाराष्ट्र राज्याचे अधिकार पत्र धारण करीत असल्याचे किंवा महाराष्ट्र भरती झाल्याचे व मेजर व नौदल आणि वायुदलातील तत्सम दर्जाच्या हुद्दापर्यंत वा (या हुद्दापेक्षा कमी हुद्दावरुन) निवृत्त माजी सैनिक असल्याचे प्रमाणपत्र.<br>३. मागील वर्षाची गुणपत्रीका.<br>**दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप**<br>प्रवेश शुल्क - १०० टक्के<br>सत्र शुल्क - १०० टक्के<br>ग्रंथालय शुल्क - १०० टक्के<br>प्रयोगशाळा शुल्क - १०० टक्के<br>**शिक्षण शुल्क** - लाभार्थी विद्यार्थ्याच्या शिक्षण शुल्काची रक्कम महाविद्यालयांकडून आकारली जात नाही. तसेच संबंधित महाविद्यालयास सदरची रक्कम देण्यात येत नाही. |

<table>
<tr>
<td>६.</td>
<td>एकलव्य आर्थिक सहाय्य योजना</td>
<td>शासन निर्णय दिनांक ०७.०२.१९९६</td>
<td>३.योजनेचे स्वरुप-राज्य शासनाकडून होतकरु व गरिब विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करता यावे यासाठी एकलव्य आर्थिक सहाय्य योजना सुरु करण्यात आलेली आहे.<br>
४.योजनेचा उद्देश-होतकरु व गरिब विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करता यावे यासाठी सहाय्य करणे.<br>
५. योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव- सर्व प्रवर्गासाठी<br>
६.योजनेच्या प्रमुख अटी-<br>
१. कला, वाणिज्य, विधी व शिक्षणशास्त्र शाखेमध्ये पदवी अभ्यासक्रमामध्ये ६० टक्के व विज्ञान शाखेमध्ये पदवी अभ्यासक्रमामध्ये किमान ७० टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.<br>
२. विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ७५,०००/- किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे.<br>
३. विद्यार्थी हा महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>
४. संबधित लाभार्थी विद्यार्थी कुठेही पूर्णवेळ नोकरी करणारा नसावा.<br>
५. शिष्यवृत्ती घेणारा विद्यार्थी शुल्क माफीच्या सवलतीस पात्र राहिल<br>
६. अर्धवेळ अभ्यासक्रमाचा विद्यार्थी या शिष्यवृत्तीसाठी पात्र राहणार नाहि.<br>
७. बी.एड. प्रशिक्षण अभ्यासक्रम तसेच एम. फील. व पी.एच.डी. तत्सम अभ्यासक्रमासाठी हि योजना लागू नाही.<br>
८. सदर शिष्यवृत्ती मंजूर झाल्यास इतर केंद्र /राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेता येणार नाही.<br>
९. महाराष्ट्र राज्याच्या बाहेर शिकत असलेले महाराष्ट्रातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकत नाहीत.<br>
१०. नियमित उपस्थिती ७५ टक्के असण आवश्यक आहे.<br>
११. नुतनीकरणासाठी पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या पहिल्या वर्षी किमाण ५० टक्के गुण असणे आवश्यक आहे.<br>
१२. नूतनीकरणासाठी विद्यार्थ्यांने मागील वर्षीच्या Application ID चा उपयोग करावा.<br>
७. आवश्यक कागदपत्रे<br>
१. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>
२. शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षांचे संबंधित तहसिलदार अथवा सक्षम अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>
३. मागील वर्षाची गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे.<br>
४.नूतनीकरणासाठी उपस्थिती प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.<br>
८. दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप<br>
सदर शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या विद्यार्थांना प्रतिवर्ष रु ५०००/- प्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येते.</td>
</tr>
<tr>
<td>७</td>
<td>शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती</td>
<td>शासन निर्णय दिनांक १३-०८-१९८५, दिनांक ०५-०२-२००४</td>
<td>सदर योजना राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयामध्ये पी.एच.डी. करता यावी.या उद्देशाने ही योजना सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजनेसाठी खालीलप्रमाणे १४ संच मंजुर आहेत.
<table>
<tr><th>अ.क्र</th><th>शासकीय संस्था महाविद्यालयाचे नाव</th><th>संच</th></tr>
<tr><td>१</td><td>शासकीय विज्ञान संस्था मुंबई</td><td>३</td></tr>
<tr><td>२</td><td>शासकीय विज्ञान संस्था नागपुर</td><td>३</td></tr>
<tr><td>३</td><td>शासकीय विज्ञान संस्था औरंगाबाद</td><td>३</td></tr>
<tr><td>४</td><td>शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती</td><td>१</td></tr>
<tr><td>५</td><td>वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था नागपुर</td><td>१</td></tr>
</table></td>
</tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | | | <table><tr><td>६</td><td>राज्यातील अकुषी विद्यापीठे व सल्नित महाविद्यालये यामधील विद्यार्थांसाठी.</td><td>३</td></tr><tr><td></td><td>**एकूण**</td><td>**१४**</td></tr></table><br>सदर योजना राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयामध्ये पी.एच.डी. करता यावी. ही योजना सर्व प्रवर्गासाठी योजना लागु आहे.<br>**योजनेचे प्रमुख अटी**<br>१. विद्यार्थी हा महराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>२. संबंधित छात्र कोठेही सेवेत नसावा. तसेच इतर कोणतीही शिष्यवृत्ती अथवा विद्यावेतन स्विकारता येणार नाही.<br>३. संबंधित विद्यार्थ्याने पीएच.डी.साठी विद्यापीठामध्ये रीतसर नोंदणी करुन संबंधित मार्गदर्शकाने शिफारस करणे आवश्यक आहे.<br>४. विद्यार्थ्याने जो विषय निवडला असेल त्या विषयासाठी विद्यापीठाने मान्यता दिलेल्या मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली पुर्ण वेळ संशोधन कार्य करावे लागेल.<br>५. अधिछात्रवृत्तीचा कालावधी ३ वर्षाचा राहिल.<br>६. सदर शिष्यवृत्ती चे राज्य स्तरावर ३ व महाविद्यालयीन स्तरावर ११ संच आहेत.<br>७. या शिष्यवुत्तीसाठी उत्पन्न मर्यादा नाही.<br>८. ज्या विद्यार्थांनी पदवी (बी.ए./बीएससी/बीएड) आणि पदव्युत्तर (एम.ए./एमएससी/एम.एड.) यापैकी कोणत्याही एका पदवी परीक्षेत किमान ६० टक्के (प्रथम श्रेणी) गुण प्राप्त केले आहेत व अन्य पदवी परीक्षेत ५५ टक्के (व्दितीय श्रेणी ) गुण प्राप्त केली आहेत, असे विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र आहेत.<br>तथापी एखाद्या वर्षी वरील अट पुर्ण करणारे विद्यार्थी उपलब्ध नसतील तर त्या वर्षी ज्या विद्यार्थाने पदवी व पदव्युत्तर स्तरावर व्दितीय श्रेणी (५५ टक्के) गुण प्राप्त केली आहे असे विद्यार्थी पात्र समजले जातील.<br>९. सदर शिष्यवृत्ती साठी केवळ (बी.ए./बीएससी/बीएड) आणि पदव्युत्तर (एम.ए/एमएससी/एम.एड.) हे अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेले विद्यार्थीच अर्ज करु शकतात.<br>१०. महाराष्ट्र राज्याचा बाहेर शिकत असलेले महाराष्ट्रातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करु शकत नाहीत.<br>११. या सवलती समाधानकारक प्रगती, चांगली वर्तणुक व नियमित उपस्थिती असल्यास विहित अभ्यासक्रम संपेपर्यत चालू राहतील.<br>१२. नुतनीकरनासाठी विद्यार्थ्याने मागील वर्षीच्या अर्जाच्या Application ID चा उपयोग करावा.<br>**आवश्यक कागदपत्रे**<br>१. अर्जदार महराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.<br>२. मार्गदर्शकासाठी विद्यापीठाचे मान्यता पत्र.<br>३. पीएच.डी. मार्गदर्शक यांचे, विद्यार्थी त्यांचेकडे पीएच.डी. करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र.<br>४. पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम गुणपत्रिका.<br>५.नुतनीकरणासाठी मागील वर्षाचा मार्गदर्शकाने दिलेला प्रगती अहवाल.<br>**शिष्यवृत्तीसाठी दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप**<br>सदर योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यास प्रती माह ७५० प्रमाणे रक्कम रू. ७५००/- व रु १०००/- वार्षिक सादीलवार खर्च हे लाभ देण्यात येतात. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | **शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती** | शासन निर्णय दिनांक ०२.०९.१९८६ | शासन निर्णय दिनांक ०२.०९.१९८६ नुसार शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती दिली जाते. राज्यातील शासकीय विद्यानिकेतन यामधुन शालांत प्रमाणपत्र परीक्षा (१० वी) उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणसाठी विद्यानिकेतन ही शिष्यवृत्ती दिली जाते.<br>सदर योजनेसाठी शासकीय विद्यानिकेतन पुसेगाव, अमरावती, औरंगाबाद, व धुळे यांचेकरिता प्रत्येकी २० प्रमाणे एकुण ८० संच मंजुर आहे.<br>**योजनेच्या प्रमुख अटी-**<br>१. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.<br>२. शासकीय विद्यानिकेतन पुसेगांव, अमरावती, औरंगाबाद, व धुळे मधून इयत्ता १०वी च्या वर्गात ६० टक्के गुण आवश्यक आहे.<br>३. महाराष्ट्र राज्याच्या बाहेर शिकत असलेले महाराष्ट्रातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकत नाहीत.<br>४. या सवलती समाधानकारक प्रगती , चांगली वर्तणूक व नियमित उपस्थिती असल्यास विहित अभ्यासक्रम संपेपर्यत चालू राहतील.<br>५. मागील वर्षी दिर शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेले विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणासाठी अर्ज करू शकतात.<br>**आवश्यक कागदपत्रे-**<br>१. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र<br>२. मागील वर्षाची गुणपत्रिका.<br>३. बोनाफाईड प्रमाणपत्र<br>४. शासकीय विद्यानिकेतनाव्दारे प्राप्त इन्टायटलमेंट कार्ड .<br>**दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप-**<br>इयत्ता १० वी १२वी प्रतिमाह १०० प्रमाणे रक्कम रु. १०००/- . पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी प्रतिमाह १५० प्रमाणे रक्कम रु.१५००/-. उमेदवारांची निवड मेरिटच्या आधारावर आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | **जवाहरलाल नेहरू विद्यापीठ शिष्यवृत्ती** | शासन निर्णय दिनांक ०७.०५.१९८३, दिनांक ०५.०२.२००४ | **योजनेचे स्वरूप-** जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली यांचे कडून विहित नियमानुसार त्या विद्यापीठात शिकत असलेल्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यामधून एका विद्यार्थ्यांची सदर शिष्यवृत्ती साठी निवड केली जाते. जवाहरलाल नेहरु विद्यापीठाने निवड केल्यानुसार विद्यार्थ्यास महाराष्ट्र शासनाची मंजूरी घेतल्यानंतर सदर शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.<br>**योजनेचा उद्देश-** जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली या विद्यापीठामध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी सहाय्य करणे.<br>**योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव-** सर्व प्रवर्गासाठी<br>**योजनेची प्रमुख अटी**<br>१. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>२. जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली यांचे कडून विहित नियमानुसार त्यांचे विद्यापीठात<br>शिकत असलेल्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांमधून एका निवड केलेल्या विद्यार्थ्यास महाराष्ट्र शासनाची मंजुरी घेऊन सदर शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.<br>३. संशोधन अभ्यासक्रमास जवाहरलाल नेहरु विद्यापीठ नवी दिल्ली येथे प्रवेश घेतलेले विद्यार्थी<br>या योजनेसाठी पात्र आहेत.<br>४. नूतनीकरनासाठी जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली यांचेकडील वार्षिक प्रगती अहवाल.<br>**आवश्यक कागदपत्रे**<br>१. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र<br>२. मागील वर्षाची गुणपत्रिका<br>३. नूतनीकरणासाठी जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली यांचेकडील वार्षिक प्रगती अहवाल.<br>**दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप**<br>सदर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विद्यार्थास दरमहा रु.८००/- व रु. १००००/- वार्षिक सादीलवार खर्च अशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. |
| १० | **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना.** | उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक 7.10.2017, 31.03.2018, 07.08.2018 व दिनांक .117.2019.दि. 08.07.2024, 10-10-24 | उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक ७.१०.२०१७,३१.०३.२०१८,०७.०८.२०१८ व दिनांक ११.०७.२०१९. अन्वये राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी सहाय्य केले जाते.<br>सदर योजना बिगर आरक्षित प्रवर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थांना लागू राहील.<br>**सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रता खालीलप्रमाणे आहे.**<br>१) अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा. तथापि महाराष्ट्र- कर्नाटक राज्य सीमा भागातील विद्यार्थी या<br>योजनेसाठी अर्ज सरू शकतात.<br>२) अर्जदाराच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ८ लाख किंवा त्यापेक्षा कमी असण आवश्यक आहे.<br>३) शासन निर्णय दिनांक ०७/१०/२०१७ (डीएचई अभ्यासक्रम) मधील अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेले विद्यार्थी अर्ज<br>करू शकतात.<br>४) शासन निर्णयानुसार प्रथम दोन मुले या योजनेसाठी पात्र आहेत.<br>५)अर्जदाराने इतर कोणतयाही शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेतलेला नसावा.<br>६) या योजनेचा लाभ दूरस्थ पद्धतीने (Open /Distance/Virtual learning)अथवा अर्धवेळ स्वरुपात चालविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळणार नाही.<br>७) तसेच योजनेच्या लाभाकरीता अनुज्ञेय असलेला अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची व संबंधित सक्षम |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | संस्थाची (AICTE/PCI/COA/MCI/NCTE, विद्यापिठ / शिक्षण मंडळा, इ.) पूर्व मान्यता व संलग्नता असणे आवश्यक राहिल.<br>८)अर्जदार विद्यार्थ्या प्रत्येक सत्र अथवा वर्षाची परीक्षा देणे आवश्यक राहिल.<br>९) मागील वर्षी सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणासाठी अर्ज करू शकतात.<br><br>**दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप** शासन निर्णय दिनांक 08.07.2024 नुसार-- |

**A) Tuition Fees :-**

| **Income Limit** | **Courses** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Government | Non Government Aided | Partially Aided / UnAided | Permanent Unaided |
| **Professional Courses** | | | | | |
| Up to Rs. 2.50 Lakh | Girl with professional course | 100% | 100% | 100% | 100% |
| | Boy | 100% | 100% | 50% | 50% |
| 2.50 Up to Rs. 8 Lakh | Girl with professional course | 100% | 100% | 100% | 100% |
| | Boy | 50% | 50% | 50% | 50% |
| **Non Professional Course** | | | | | |
| Up to Rs. 8 Lakh | Girl with non-professional course | 100% | 100% | 100% | 100% |
| | Boy | 100% | 100% | 100% | 100% |

**B) Exam Fees :-**

| | | |
|---|---|---|
| Professional Course | Girl with professional course | 100% |
| | Boy | 50% |
| Non professional course | Girl with non-professional course | 100% |

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td></td>
<td>
<table>
<tr><td></td><td>Boy</td><td>100%</td></tr>
</table>
<br>
उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण योजना<br>
शासन निर्णय दि. 7.10.2017 नुसार राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पाअनुदान) व कायम विना अनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशित कुटुंबाचे वार्षिक उत्पन्नरक्कमरु. 8.00 लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशाआर्थिक दृष्ट्यात दुर्बलघटकांतील मुला-मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या 100 टक्के लाभ देण्यात येतो. सदर योजना शासन निर्णय 8 जुलै 2024 अन्वये व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिक दृष्ट्यात दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील नविन प्रवेशित तसेच पूर्वी पासून प्रवेश असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना उच्च व तंत्रशिक्षण विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून वर्ष 2024-25 पासून शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या 100 टक्के लाभ देण्यात येणार आहे.
</td>
</tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | **गणित व भैतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती योजना** | -शासन निर्णय दिनांक १४.०५.१९७१, दिनांक ०५.०२.२००४ | **योजनेचे स्वरुप--**राज्यातील गणित भैतिकशास्त्र विषयात इ. १२ वी मध्ये विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास उत्तेजन मिळावे म्हणून सदर शिष्यवृत्ती दिली जाते.<br>सदर योजनेसाठी गणित विषयासाठी ५० व भैतिकशास्त्र विषयासाठी ५० असे एकुण १०० संच मंजुर आहेत.<br>**योजनेचा उद्देश-**राज्यातील गणित भौतिकशास्त्र विषयात इ. १२ वी मध्ये विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास उत्तेजन देणे.<br>**योजना ज्या प्रवर्गसाठी लागू आहे त्याचे नाव-** सर्व प्रवर्गसाठी<br>**योजनेच्या प्रमुख अटी**<br>१. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>२. इ. १२ विज्ञान या परीक्षेत किमान ६० टक्के व गणित किंवा भौतिकशास्त्र या विषयात ६० टक्के पेक्षा अधिक गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.<br>३. पदवी अभ्यासक्रमांसाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेताना गणित किंवा भौतिकशास्त्र हा प्रमुख विषय घेणारे विद्यार्थ्यीच या योजनेसाठी अर्ज करण्यासाठी पात्र आहेत.<br>४. महाराष्ट्र बाहेर शिकत असलेले महाराष्ट्रातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करु शकत नाहीत.<br>५. या सवलती समाधानकारक प्रगती, चांगली वर्तणूक व नियमित उपस्थिती असल्यास विहित अभ्यासक्रम संपेपर्यंत चालू राहतील.<br>६. मागील वर्षी सदर शिष्यवृत्ती चा लाभ घेतलेले विद्यार्थ्यी शिष्यवृत्ती च्या नूतनीकरणासाठी अर्ज करु शकतात.<br>**आवश्यक कागदपत्रे**<br>१. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र<br>२. मागील वर्षाची गुणपत्रिका<br>३. बोनाफाईड सर्टिफिकेट<br>**दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप**<br>सदर योजनेयसाठी पात्र विद्यार्थांना प्रतिमाह १०० रु. याप्रमाणे दहा महिन्याकरिता रक्कम रु. १०००/- शिष्यवृत्ती देण्यात येते. |

<table>
<tr>
<td>१२</td>
<td>राज्य शासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती योजना</td>
<td>शासन निर्णय क्र-२ एससीएच २००३/(४०५/०३) मशि-१, दि.०५.०२.२००४.</td>
<td>
१.योजनेचा शासन निर्णय-<br>
१. शिक्षण व सेवायोजन विभाग,शा.नि.क्र.एससीएच-१०६५-यु,दि.२९. सप्टेंबर १९६५<br>
२. शासन निर्णय क्र-२एससीएच २००३/(४०५/०३) मशि-१,दि.०५.०२.२००४.<br>
योजनेचा प्रकार/स्वरुप-<br>
सदर शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे संच मंजूर करण्यात येतात.
<table>
<tr><th>अ क्र</th><th>शासकीय महाविद्यालये</th><th>निर्धारीत संच</th></tr>
<tr><td>१</td><td>शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय,औरंगाबाद</td><td>६</td></tr>
<tr><td>२</td><td>इस्माईल युसुफ महाविद्यालय,मुंबई</td><td>४</td></tr>
<tr><td>३</td><td>शासकीय विधी महाविद्यालय,मुंबई</td><td>४</td></tr>
<tr><td>४</td><td>सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय,मुंबई</td><td>४</td></tr>
<tr><td>५</td><td>शासकीय विज्ञान संस्था,मुंबई</td><td>६</td></tr>
<tr><td>६</td><td>एलफिन्स्टन महाविद्यालय,मुंबई</td><td>६</td></tr>
<tr><td>७</td><td>शासकीय विज्ञान संस्था,नागपूर</td><td>६</td></tr>
<tr><td>८</td><td>वसंतराव नाईक कला व समाजविज्ञान संस्था,नागपूर</td><td>६</td></tr>
<tr><td>९</td><td>शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था,अमरावती</td><td>६</td></tr>
<tr><td>१०</td><td>राजाराम महाविद्यालय,कोल्हापूर</td><td>६</td></tr>
<tr><td></td><td>एकूण</td><td>५४</td></tr>
<tr><td></td><td>विद्यापीठाचे नांव</td><td>निर्धारीत संच</td></tr>
<tr><td>१</td><td>मुंबई विद्यापीठ,मुंबई</td><td>४</td></tr>
<tr><td>२</td><td>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे</td><td>४</td></tr>
<tr><td>३</td><td>राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ,नागपूर</td><td>४</td></tr>
<tr><td>४</td><td>डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद</td><td>४</td></tr>
<tr><td>५</td><td>एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ,मुंबई</td><td>२</td></tr>
<tr><td>६</td><td>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर</td><td>४</td></tr>
<tr><td></td><td>एकूण</td><td>२२</td></tr>
</table>
योजनेच्या प्रमुख अटी-<br>
१. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासांठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करण्यास्तव पात्र आहेत.
</td>
</tr>
</table>

२. विद्यार्थी उपरोक्त विद्यापीठांतर्गत पदवी परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण असला पाहिजे.
३. संच रिक्त असतील तर व्दितीय श्रेणीत उत्तीर्ण असलेला विद्यार्थी पात्र ठरु शकेल.
४. विद्यापीठांतील संचासाठी ज्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठात कला,वाणिज्य,विज्ञान व विधी या विषयासाठी प्रवेश घेतलेला असेल तसेच संबंधित विद्यापीठाशी संलग्नित अशासकीय महाविद्यालयात कला,वाणिज्य,विज्ञान व विधी या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असेल असे विद्यार्थी अर्ज करु शकतात.
५. शासकीय महाविद्यालयातील विद्यार्थी पदवी परीक्षेतील गुनवत्तेनुसार निवडले जातील तसेच महाविद्यालयातील अधिछात्रांसाठी कला व विज्ञान अभ्यासक्रमातील विषंयासाठी समान संच निवडले जातील.
६. विद्यार्थ्यांचे अभ्यासातील समाधानकारकच प्रगती व उपस्थितीनुसार दुस-या वर्षीचे नुतनिकरण मंजूर करण्यात येईल.
७. असमाधानकारक प्रगती व असमाधानकारक वर्तणुक असल्यास सदर शिष्यवृत्ती दिली जाणार नाही.
८. दोन अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला विद्यार्थी सदर शिष्यवृत्तीसाठी पात्र असणार नाही.
९. नोकरी करणारा अथवा इतर विद्यावेतन मिळविणारा विद्यार्थी सदर शिष्यवृत्तीसाठी पात्र असणार नाही.

**आवश्यक कागदपत्रे-**

१. पदवी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्राची छायांकित प्रत
२. महाविद्यालयात प्रवेश घेतलेबाबतचे बोनाफाईड प्रमाणपत्र
३. सक्षण प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र आवश्यक

**लाभाचे स्वरुप**

नविन मंजूरीस्तव अर्ज करणा-या विद्यार्थ्यांस शा.नि.०५.०२.२००४ प्रमाणे प्रति माह २५०/- प्रमाणे रक्कम रु.२५००/-

<table>
<tr>
<td>१३</td>
<td>राज्य शासनाची खुली गुणत्ता शिष्यवृत्ती</td>
<td>शासन निर्णय दिनांक १६.११.१९६४, दिनांक ०५.०२.२००४</td>
<td>
शासन निर्णय दिनांक १६.११.१९६४, दिनांक ०५.०२.२००४अन्वये राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती ही योजना सुरू करण्यात आली. राज्यातील गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास उत्तेजन मिळावे म्हणून सदर शिष्यवृत्ती दिली जाते, हि योजना सर्व प्रवर्गासाठी लागू आहे. सदर योजनेसाठी एकुण १२०८ संच शाखानिहाय खालीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेले आहेत.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>शाखा</th><th>निर्धारित संच</th></tr>
<tr><td>१</td><td>कला</td><td>२८५</td></tr>
<tr><td>२</td><td>वाणिज्य</td><td>२३०</td></tr>
<tr><td>३</td><td>विज्ञान</td><td>६३८</td></tr>
<tr><td>४</td><td>विधी</td><td>५५</td></tr>
<tr><td colspan="2">एकूण</td><td>१२०८</td></tr>
</table>
<br>
योजनेच्या प्रमुख अटी-<br>
१. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असण आवश्यक आहे.<br>
२. इयत्ता बारावी मध्ये किमान ६० टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे.<br>
३. कला, वाणिज्य, विज्ञान आणि विधी शाखेच्या पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज (Fresh)करण्यास पात्र आहेत.<br>
४. महाराष्ट्र राज्याच्या बाहेर शिकत असलेले महाराष्ट्रातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकत नाहीत.<br>
५. या सवलती समाधानकारक प्रगती, चांगली वर्तणूक व नियमित उपस्थिती असल्यास विहित अभ्यासक्रम संपेपर्यंत चालू राहिल.<br>
६. मागील वर्षी सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेले विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणासाठी अर्ज करू शकतात.<br>
आवश्यक कागदपत्रे-<br>
१. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र<br>
२. मागील वर्षाची गुणपत्रिका<br>
३. बोनाफाईड सर्टिफिकेट<br>
सदर योजनेसाठी प्रतिमाह १०० रु. याप्रमाणे दहा महिन्याकरिता रक्कम रु. १०००/- शिष्यवृत्ती देण्यात येते. नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.
</td>
</tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| १४. | **राज्यशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना भाग २** | अल्पसंख्यांक विकास विभाग, अविवि-2011/प्र.क्र.44/11/का.6दि.14-ऑक्टोबर 2011 | राज्य शासनाने अल्पसंख्यांक लोकसमुह म्हणून घोषीत केलेल्या राज्यातील मुस्लीम, बौद्ध, ख्रिश्चन,जैन, शीख, पारशी व ज्यू या समाजातील तांत्रिक व व्यावसायिक तसेच इयत्ता बारावी नंतरच्या सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या (कला, वाणिज्य, विज्ञान पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम) विद्यार्थ्यांना सदरहू योजना लागू आहे.<br>सदर योजना खालील अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू आहे.<br>१) इयत्ता १२ वी नंतरच्या मान्यता प्राप्त अभ्यासक्रमांमध्ये (कला, वाणिज्य, विज्ञान) प्रथम वर्ष ते अंतिम वर्षात शिकत असलेल्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना लागू आहे.<br>२) विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याने उच्च माध्यमिक शालांत परीक्षा महाराष्ट्र राज्यातून उत्तीर्ण केलेली असावी.<br>३) या योजने अंतर्गत शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्याला अन्य शिष्यवृत्ती अथवा विद्यावेतन याचा लाभ घेता येणार नाही.<br>४) पालकांचे वार्षिक उत्पन्न हे रु. ८.०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी असावे.<br>५)नुतनिकरणासाठी विद्यार्थ्यांने पूढील वर्षात प्रवेश घेतलेला असणे आवश्यक आहे.<br>६) या योजनेअंतर्गत ३०% शिष्यवृत्ती मुलींसाठी राखुन ठेवण्यात येतील.<br>७) जर एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे शिष्यवृत्ती मिळविली असल्याचे निदर्शनास आल्यास त्या विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.<br>**शिष्यवृत्ती रक्कम** - प्रत्यक्ष वार्षिक शैक्षणिक शुल्क किंवा रु. ५०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम. |
| | **केंद्र शासन पुरस्कृत योजना** | | |

१

**केंद्रशासन स्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शा. नि. क्र. संकीर्ण 2007/(542/07)/ तांशि-1 दि. 21.1.2008

**योजनेसाठी प्रवर्गनिहाय निर्धारित संच :-**

केंद्रशासनाकडून राज्यातील मुस्लीत,ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन व बौध्द या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेचा अर्ज भरण्यास पात्र असतील. सदर शिष्यवृत्ती ११ वी ते पी.एचडी. व्यावसायिक (डी.एड, बी.एड, आय.टी.आय ) सर्व अभ्यासक्रमांना देण्यात येते. (तंत्र शिक्षण विभागातील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यादीतील अभ्यासक्रम सोडून ) केंद्रशासनाकडून या शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र राज्यासाठी **४७५७५** संच निर्धारीत करण्यात आलेले आहेत. त्यापैकी मुलींसाठी ३० टक्के संच राखीव आहेत.

प्रवर्ग निहाय माहिती.

| अ.क्र. | प्रवर्ग | मंजूर संच | संचालनालय स्तरावरुन मंजूर (only fresh) | केंद्र शासनाकडून मंजूर अर्ज |
|---|---|---|---|---|
| १ | मुस्लिम | २७७३४ | ४२८९८ | २८१४० |
| २ | ख्रिश्चन | २३०९ | ९९२ | ८९७ |
| ३ | शिख | ४७७ | १७२ | १६२ |
| ४ | बौध्द | १३९६५ | १४८२ | १३९४ |
| ५ | जैन | २९९४ | २०६३ | १९९० |
| ६ | पारसी | ९६ | ६ | ६ |
| | **एकूण** | **४७५७५** | **४७६१३** | **३२५८९** |

**योजनेची पात्रता**

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. विद्यार्थी मागील वार्षिक परीक्षेत किमान ५० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.
३. नवीन मंजूरी (Fresh)अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २.०० लाख पर्यंत असावे.
४. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.
५. नूतनीकरणासाठी(Renewal) विद्यार्थ्यास मागील वार्षिक परीक्षेत ५० टक्के गुण असणे आवश्यक आहे तसेच विद्यार्थी त्याच महाविद्यालयात व त्याच अभ्यासक्रमात शिकत असणे आवश्यक आहे.
६. एका कुटुंबातील फक्त दोन अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल.
७. विद्यार्थ्याने घेतलेला अभ्यासक्रम कमीत कमी १ वर्ष कालावधीचा असणे आवश्यक आहे.

**अनुज्ञेय लाभ :-**

केंद्रशासनपुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनेंतर्गत प्रवेश शुल्क तसेच शिक्षण शुल्क व निर्वाह भत्ता लाभ खालीलप्रमाणे देण्यात येतात.

| अ.क्र. | शुल्क प्रकार | अभ्यासक्रम | देय लाभ |
|---|---|---|---|
| १ | शिक्षण शुल्क | इ. ११ वी व इ. १२ वी. | रु. ७,०००/- प्रतिवर्ष |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | इ. ११ वी १२ वी समकक्ष व्यावसायिक अभ्यासक्रम | रु. १०,०००/- प्रतिवर्ष | |
| | | | | | पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम | रु. ३,०००/- प्रतिवर्ष | |
| | | | २ | निर्वाह भत्ता | इ. ११ वी १२ वी | १. दहा महिन्यासाठी रु. ३,८००/- (हॉस्टेल मध्ये वास्तव्य असलेल्या विद्यार्थ्यांकरीता) | |
| | | | | | तसेच समकक्ष व्यावसायिक अभ्यासक्रम | २. दहा महिन्यासाठी रु. २,३००/- (हॉस्टेल मध्ये राहत नसलेल्या विद्यार्थ्यांकरीता) | |
| | | | | | पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम (बिगरव्यावसायिक अभ्यासक्रम) | १. दहा महिन्यासाठी रु. ५,७००/- (हॉस्टेल मध्ये वास्तव्य असलेल्या विद्यार्थ्यांकरीता) | |
| | | | | | | २. दहा महिन्यासाठी रु. ३,०००/- (हॉस्टेल मध्ये राहत नसलेल्या विद्यार्थ्यांकरीता) | |
| | | | | | एम.फिल व पीएचडी अभ्यासक्रम | १. दहा महिन्यासाठी रु. १२,०००/- (हॉस्टेल मध्ये वास्तव्य असलेल्या विद्यार्थ्यांकरीता) | |
| | | | | | | २. दहा महिन्यासाठी रु. ५,५००/- (हॉस्टेल मध्ये राहत नसलेल्या विद्यार्थ्यांकरीता) | |

<table>
<tr>
<td>२.</td>
<td>केंद्रशासन पुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजनेबाबत.</td>
<td>उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शा. नि. क्र. शिष्यवृ-2008/(254/08)/ मशि -6,<br>दि. 22 जानेवारी, 2009</td>
<td>सदर शिष्यवृत्तीसाठी राज्यासाठी नविन (Fresh) शिष्यवृत्तीसाठी ७४१७ संच निर्धारित केलेले आहेत. सदर शिष्यवृत्ती उच्च माध्यमिक इयत्ता १२ वी (१०+२) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी देण्यात येते.<br>योजनेची पात्रता<br>१. सदर नवीन (Fresh) शिष्यवृत्तीचा अर्ज भरणेसाठी HSC बोर्डचे टॉप २०th Percentile यादीतील सर्व विद्यार्थी पात्र असतात.<br>२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा/स्टायपेंड लाभार्थी नसावा.<br>३. नवीन (Fresh) मंजूरीचे अर्ज भरणा-या विद्यार्थ्याच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्तपन्न रु.४.५० लाख पेक्षा जास्त नसावे.<br>४. नुतनीकरणचा अर्ज भरणेसाठी विद्यार्थ्यांने मागील वर्षीक परीक्षेत ५० टक्के गूण प्राप्त करणे आवश्यक आहे.<br>५. महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती ७५ टक्के असणे आवश्यक आहे.<br>६. नुतनीकरणचा अर्ज भरणेसाठी विद्यार्थ्यांने पालकांचे एकत्रित वार्षिक उत्तपन्न अट लागू नाही.<br>७. एखादा पात्र विद्यार्थी नुतनिकरणासाठी अर्ज करावयाचा राहीला असेल तर पुढील वर्षी अर्ज करण्यास पात्र असेल. (परंतू ज्या वर्षाचा अर्ज करण्याचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही.)<br>८. एखादया पात्र विद्यार्थ्यांचा नुतनिकरणासाठी अर्ज महाविद्यालय स्तरावर पडताळणी करावयाचा राहीला असेल तर सर्व अशा सर्व विद्यार्थ्यांना पुढील वर्षी योजनेसाठी अर्ज करता येईल. (परंतू ज्या वर्षाचा अर्ज करण्याचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही.)<br>टॉप २०th Percentile यादीतील विद्यार्थीसाठी केंद्रशासनाचे आरक्षित धोरण पुढीलप्रमाणे आहे.
<table>
<tr><th>अ.क्र</th><th>प्रवर्ग</th><th>टक्केवारी</th></tr>
<tr><td>१</td><td>एस.सी</td><td>१५ टक्के</td></tr>
<tr><td>२</td><td>एस.टी</td><td>७.५ टक्के</td></tr>
<tr><td>३</td><td>ओबिसी</td><td>२७ टक्के</td></tr>
<tr><td>४</td><td>दिव्यांग</td><td>५ टक्के</td></tr>
</table>
जर प्रवर्गानुसार विद्यार्थी प्राप्त न झाल्यास ज्या प्रर्वगातून जास्त विद्यार्थी आहेत तेथे विभागण्यात येईल. राज्याला नेमुन दिलेल्या संचा पैकी ५० टक्के शिष्यवृत्ती जागा मुलींसाठी राखीव असेल.</td>
</tr>
</table>

<table>
<tr>
<td>३.</td>
<td>केंद्रशासन पुरस्कृत दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना.</td>
<td>शासनाच्या दिनांक 26 फेब्रुवारी 2016 च्या पत्रान्वये सदर ऑनलाईन शिष्यवृत्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य , पुणे यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.</td>
<td>
सदर शिष्यवृत्तीसाठी राज्यासाठी नवीन (Fresh) शिष्यवृत्तीसाठी १८७९ संच निर्धारित केलेले आहेत. सदरह शिष्यवृत्ती ११वी, १२वी, पोस्ट मॅट्रिक डिप्लोमा / सर्टिफिकेट पदवी, पदव्युत्तर डिग्री/डिप्लोमा तसेच सर्टिफिकेट या अभ्यासक्रमासाठी देण्यात येते.<br>
योजनेची पात्रता<br>
१. अपंगत्व टक्केवारी ४० टक्के व त्यापुढील असावी.<br>
२. मागील वार्षिक परिक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.<br>
३. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड लाभार्थी नसावा.<br>
४. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रू . २.५० लाख पर्यंत असावे.<br>
५. विद्यार्थ्याने घेतलेला अभ्यासक्रम कमीत कमी १ वर्ष कालावधीचा असणे आवश्यक आहे.<br>
पोस्ट मॅट्रिक, प्रि-मॅट्रिक, टॉपक्लास तीन्ही योजनेचे मिळून ५०% मुलींसाठी राखीव जागा आहेत जर मुलींची संख्या उपलब्ध न झाल्यास सदरील जागा मुलांमध्ये विभागूण देण्यात येतील. तसेच दुरस्त शिक्षण ( Distance Education )घेत असणारे सर्व विद्यार्थी योजनेचा अर्ज भरु शकतात.<br>
अनुज्ञेय लाभ :-निर्वाह भत्ता
<table>
<tr><th>अ. क्र</th><th>कोर्सेस</th><th>हॉस्टेल मध्ये वास्तव्य असलेल्या विद्यार्थ्यांना दहा महिन्याकरीता</th><th>हॉस्टेल मध्ये राहत नसलेल्या विद्यार्थ्यांना दहा महिन्याकरीता</th></tr>
<tr><td>१</td><td>अभियांत्रिकी,वैद्यकीय,व्यवस्थापन,संगणक विज्ञान, कृषी, नियोजन/आर्किटेक्चर, फॅशन तंत्रज्ञान, पशुवैद्यकीय, आणि संबंधित विज्ञान,व सर्व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी</td><td>रु.१६०००/-</td><td>रु.७५००/-</td></tr>
<tr><td>२</td><td>पदवी/डिप्लोमा, फार्मसी (बी.फार्मा ) एलएलबी, बीएफएस,हॉटेल मॅनेजमेंट, पॅरामेडिकल शाखा, जसे की पुनर्वसन, डायग्नोस्टिक्स,केटरिंग ट्रॅव्हल/पर्यटन/आतिथ्य, अंतर्गत सजावट,पोषण, आहारशास्त्र</td><td>रु.११०००/-</td><td>रु.७०००/-</td></tr>
<tr><td>३</td><td>बीए, बी.कॉम, बी.एस्सी इत्यादी अभ्याक्रम</td><td>रु.९५००/-</td><td>रु.६५००/-</td></tr>
<tr><td>४</td><td>११ वी आणि १२ वी अभ्यासक्रम, आयटीआय, व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी</td><td>रु.९०००/-</td><td>रु.५५००</td></tr>
</table>
शिक्षण शुल्क
</td>
</tr>
</table>

| अ.क्र | शुल्क |
|---|---|
| १ | केंद्र/राज्य शासनाच्या प्राधिकरणाने मंजूर केलेल्या शुल्क रचनेनुसार १.५० लाख रुपये वार्षिक कमाल मर्यादेपर्यंत दिली जाते. |

**दिव्यांग भत्ता**

| अ.क्र | दिव्यांग प्रकार | रक्कम प्रति वर्षी |
|---|---|---|
| १ | अंधत्व | रु.४०००/- |
| २ | कर्णबधीर | रु.२०००/- |
| ३ | शारीरिकदृष्ट्या अक्षम | रु.२०००/- |
| ४ | बैध्दिक अपंगत्व | रु.४०००/- |
| ५ | वरील सोडून इतर सर्व अपंगत्वासाठी | रु.२०००/- |

**पुस्तक भत्ता**

| अ.क्र. | कोर्सेस | रक्कम प्रति वर्षी |
|---|---|---|
| १ | सर्व कोर्सेससाठी | रु.१५००/- |